भारतीय कऱ्हाडे ब्राह्मण महासंघ
ॐ
स्थापना १९८१

# संपर्क

**संपर्कात राहुया ! संपर्क वाढवुया !!**

कऱ्हाडे ब्राह्मण महासंघाने कऱ्हाडे ज्ञाती बांधवांसाठी चालविलेले नियतकालिक (खाजगी वितरणासाठी)



**वर्ष १ ले** | **जुलै – सप्टेंबर २०१३** | **अंक १ ला**


**अध्यक्षः श्री. आनंद पराडकर**
**मो.नं ९३२६८२६८८४**

**सचिवः श्री. गोपाळ भाटवडेकर**
**मो.नं ९८५०९७९७०६**

**कोषाध्यक्षः श्री. चंद्रशेखर जोशी**
**मो.नं ९४४९०५१६५३**

संपादक मंडळ

**मुख्य संपादक :**
**श्री. हेमकिरण बाक्रे**
पुणे. ०९८५०७५४२१०

**उपसंपादक :**
**श्री. श्रीगजानन गुर्जर**
०९९७०१७४८१८

**सहाय्यक :**
श्री. अविनाश तांबे, मुंबई : ०२२-२५२४२७०६
श्री. चंद्रशेखर जोशी, बेळगांव : ०९४४९०५१६५३
श्रीमती स्वाती प्रभुदेसाई, डोंबिवली : ०९७६९३२९९९३
श्री. गजानन पाटगांवकर, ठाणे : ०९९६९२७६९२६
श्री. अविनाश जावडेकर, नागपूर : ०९८६०२५७३१५
सौ. अंजली माईणकर, सोलापूर : ०२१७-२६०१४५७
श्री. यशवंत पंडीत, सातारा : ०९८५०३११४२४
श्री. सुनील जठार, राजापूर : ०९२७०५७९४००
श्री. मिलींद पावनगडकर, कोल्हापूर : ०९२२५८००५८७
श्री. शरद खांडेकर, सांगली : ०९८२२९९५८९२
श्री. नरेंद्र पानवलकर, बडोदे : ०९२२७१३५७९४

**इतर संघांनी आपापल्या प्रतिनिधी / सहाय्यकांची नावे त्वरित कळवावी.**


**भारतीय कऱ्हाडे ब्राह्मण महासंघाचे संपर्क हे त्रैमासिक मालक, भारतीय कऱ्हाडे ब्राह्मण महासंघ (ट्रस्ट) यांचेसाठी मुद्रक व प्रकाशक गोपाळ भाटवडेकर यांनी एकविरा प्रकाशन, कर्वेनगर, पुणे येथे छापून ४३७, नारायण पेठ, अनिश प्रसाद अपार्टमेंट, पुणे ४११०३० येथे प्रसिद्ध केले. संपादक-हेमकिरण शंकर बाक्रे**


# आवाहन

'संपर्क'च्या सर्व वर्गणीदारांस याद्वारे आवाहन करण्यात येते की, आपले वर्ष ३१ मार्चला संपते, तरी आपली वार्षिक वर्गणी रु. १००/- (रुपये शंभर मात्र) (२०१३-१४ साठीची) त्वरित भरणा करावी. सदर रक्कम आपण रोख, कोणत्याही बँकेचा पुणे शाखेवर काढलेला डिमांड ड्राफ्ट किंवा पुणे येथील लोकल चेक, 'भारतीय कऱ्हाडे ब्राह्मण महासंघ' या नावाने काढून किंवा बँक ऑफ इंडिया, लक्ष्मी रोड, पुणे शाखा, खाते क्र. ०५०५११०११०००९४१० या खात्यावर जमा करून पावती खालील पत्यावर पाठवावी.

**श्री. हेमकिरण बाक्रे**
संपादक
द्वारा – कऱ्हाडे ब्राह्मण संघ, ४३७, नारायण पेठ, 'अनिश प्रासाद' अपार्टमेंट्स, भटांचा बोळ, पुणे – ४११ ०३०

ठाणे येथील वर्गणीदारांनी आपली वर्गणी श्री. गजानन पाटगांवकर, बेळगाव येथील वर्गणीदारांनी श्री. चंद्रशेखर जोशी, पुणे येथील वर्गणीदारांनी श्री. हेमंत पुराणिक, सातारा येथील वर्गणीदारांनी श्री. एम. व्ही.मोघे यांचेकडे जमा करण्यास हरकत नाही.

**– श्री. हेमकिरण बाक्रे**


**नियतकालिकाचे नाव** : 'संपर्क'
**पत्ता** : भारतीय कऱ्हाडे ब्राह्मण महासंघ,
**द्वारा :** कऱ्हाडे ब्राह्मण संघ, ४३७, नारायण पेठ, 'अनिश प्रासाद' अपार्टमेंट्स, भटांचा बोळ, पुणे – ४११ ०३०
**संपादक** : श्री. हेमकिरण बाक्रे
**मुद्रक** : एकविरा प्रकाशन आणि प्रसिद्धी सेवा, स.नं.१/२७+२९, माऊली सोसायटी, अपर्णा हाऊस समोर, विठ्ठल मंदिरामागे, कर्वेनगर, पुणे – ४११ ०५२.

संपर्क

## अनुक्रम


४ पवित्र अन् रमणीय – बद्रीकेदार

५ माझ्या आवडीचे

९ यांचेशिवाय नमस्कार तो कोणाला करावयाचा?.

१९ 'कॅन्सर माझा सांगाती'

२२ संस्थावृत्त

२३ शतायुषी

२५ गरजू रुग्णांना मदत देणाऱ्या संस्थांचे पत्ते

२७ खाद्यसंस्कृती कऱ्हाड्यांची


सदर नियतकालिकातील मजकूराशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही.

**– संपादक**

संपर्क



# संपादकीय

आजकाल देशांत 'राजकीय वातावरण प्रचंड तापले आहे. जो तो आपले घोडे पुढे दामटण्याचा प्रयत्न करतो आहे. हे वातावरण २०१४ च्या निवडणुकीच्या वेळी–जेव्हां होईल तेव्हां तापणं शिगेला पोचलेले असेल व त्यांत सामान्य माणूस कुठे फेकला गेला जाईल याची कल्पनाच करवत नाही. अर्थात् आपल्या देशांत आम आदमीचा कोणीच विचार करीत नाही, पण जे कांही चालते ते त्याच्याकरता करतो आहोत; असा आव मात्र निश्चितच आणला जातो हे आपण पहात आहोत, किंबहुना अनुभवत आहोत.

मी एक सामान्य माणूस म्हणून काय करू शकतो? याचा विचार करायला लागलो, तर अंगाची लाही लाही होते. दुर्दैव असे की, मी यांत काहीच करू शकत नाही अशा निष्कर्षाला जेव्हां मी येतो, तेव्हां माझा जन्म हा काय फुकाचा... असेच वाटायला लागते. मागच्या संपादकीयच्या आवाहनाला अनुसरून एका वाचकाने मला दूरध्वनी करून आवर्जून सांगितले की, आपण विवेकानंद, छत्रपती शिवाजी महाराज, महादेव गोविंद रानडे, महात्मा गांधी अशा व्यक्तिमत्वांचा तरुणाईसमोर आदर्श ठेवावा अशी त्यांची सूचना होती. सूचना निश्चितच चांगली आहे, पण त्याची अंमलबजावणी कशी करायची? हाही मोठा एक प्रश्नच आहे. याचे उत्तर आपल्याला शोधायचे आहे.

मतदानाच्या माध्यमांतून आपण क्रांती घडवू शकतो; असा काही वेळा प्रचार केला जातो. मतदानाचा अधिकार आपण बजवावा असेही आवर्जून सांगितले जाते. पण निवडणुकीतील उमेदवार पाहिल्यावर आपण मत कोणाला द्यायचे? हा आपल्यापुढे मोठा प्रश्न असतो. उपलब्ध उमेदवारांत कमीतकमी लबाड उमेदवार कोण? हे शोधावे लागते.

निवडणूक यंत्रणाही राजकीय नेते हळूहळू आपल्या ताब्यांत घेऊ इच्छित आहेत. कारण निवडणूक सुधारणा करण्याची त्यांची मनापासून इच्छा नाही. सुधारणा केल्याच तर आपणच आपल्या पायावर धोंडा पाडून घेऊ, याचा त्यांना विश्वास आहे.

यांत बदल करावयाचा असल्यास, तरुणाईनीच पुढाकार घेतला पाहिजे. पण जागतिकीकरणाच्या रेट्यांत व पैसे मिळवायच्या नादांत तरुणाई कितपत यांत लक्ष घालेल, याचीही आता शंका वाटते. अर्थात् हेही खरे आहे की, आपल्यापैकी कुणीतरी त्यांना नेतृत्व देणे आवश्यक आहे. अण्णा हजारेंचे आंदोलन ही एक झलक होती. पण तरुणाई तरी वरिष्ठ/ज्येष्ठ नागरिकांवर किती व कशी मदार ठेवणार?

आपण एवढे हतबल व निराश झालो आहोत, की परिस्थितीशी निकरांची झुंज द्यावयाची आपली मानसिक तयारी नाही आहे. सभोवताली परिस्थिती एवढी बिकट आहे की, तरुणाईसुद्धा यातून मार्ग काढणार की, परिस्थितीला शरण जाणार यावरच देशाचे भवितव्य अवलंबून आहे. ''देव करो व भारताचे भवितव्य उज्वल होवो.'' एवढेच म्हणणे आपल्या हातात राहिले आहे की काय असे वाटते. सद्यस्थितीत राष्ट्रीय लोकशाहीतील फाटाफूट, भ्रष्टाचारी मंत्री, राष्ट्रवादींनी महाराष्ट्रात केलेला नावापुरता बदल, मिडियामध्ये होत असलेला नको त्या प्रश्नांचा, नको इतका काथ्याकूट ज्यातून निष्पन्न काहीच होत नाही. कालचे प्रकरण बरे होते अशा व इतक्या प्रकरणांचा होणारा पर्दाफाश? त्यामुळे कुठल्याच प्रकरणांची न लागणारी तड, सकाळी घरांतून बाहेर पाऊल टाकले की, पत्करावी लागणारी शरणागती; या सर्वांचा विचार केला, तर देशाच्या भवितव्याची निश्चितच चिंता वाटू लागते. पण यातूनही आपण निश्चितच मार्ग काढू शकू असा विश्वासही श्री. संदिप वासलेकर यांचे 'एक दिशेचा शोध' यासारखी पुस्तके वाचल्यावर वाटतो.


'उपकार' सिनेमातील प्राणच्या तोंडातील असलेला एक संवाद आठवतो. रामानी प्रत्येक युगांत जन्म घेतला आहे. पण अजून भरत कुठेही जन्माला आलेला नाही व दिवसभरांत मी जे बोलतो ते सध्या जे घडते आहे, जे वास्तव आहे ते बोलतो, पण सूर्यास्तानंतर मी जे बोलतो, जे घडायला पाहिजे ते बोलतो. १९६७ च्या 'उपकार' सिनेमातील वरील वाक्ये आजही लागू पडतात. आजच्या परिस्थितीला ती अधिक चपखलपणे बसतात. यापेक्षा दुर्दैव कोणते? पण नाही, निराश व्हायचे नाही, घेतलेला वसा टाकायचा नाही, उतायचे नाही, मातायचे नाही. वैयक्तिक पातळीवर मार्ग शोधायचा व आशा करायची की, त्याचा एकत्रित परिणाम लौकरच आपल्या सर्वसामान्यांच्या जीवनांत जाणवू लागेल.

# पवित्र अन् रमणीय - बद्रीकेदार

**डॉ. गायत्री यल्लापूरकर, ९७४२०२१३५९**

**(क्रमशः पुढे चालु)**

इथेपण मोठी हंडी आहे. त्यात दान टाकायचे. शंकराचार्यांची गादी, विविध छोटी-छोटी मंदिरे सभोवताली आहेत. तीन-चारशे रुपयांपासून तीस चाळीस हजारांपर्यंत मूल्यांच्या विविध पूजा आहेत. आम्हीही सकाळची वेदपाठ Rs.(१४०१/- फक्त) ही पूजा दुसऱ्या दिवशी सकाळी ६ ची ठरवून तशी पावती घेतली. शिवलिंगे, रुद्राक्ष, नवरत्नमाळा, केदारबद्री प्रतिमा लॉकेटस्, निरांजने, तबके, पूजासाहित्य, करंडे, गरम कपडे, एक ना दोन! या भुलभुलैयात फिरतानाच 'इडली डोसा' पाटी दिसली अन् पाय आपोआप तिकडे वळले. परोठे-रोट्या सोडून 'मसाला डोसा' व 'कॉफी' असे खाल्ल्यावर अगदी बरे वाटले. केदारनाथापेक्षा कमी; पण बऱ्यापैकी थंडी होती. मग दुसऱ्या दिवशी लवकर उठून आवरुन ६ वाजता देवदर्शनासाठी 'वेदपाठच्या' रांगेत उभे राहिलो. त्याआधी Rs १५०/- प्रसाद थाळी (हरभरा डाळ-मकाणे-खडीसाखर-शेंगदाणे काजू-बेदाणे यांनी भरलेली) व तुळशीची माळ घेतली. थोड्या वेळाने वेदपाठवाल्या २०/२५ जणांना आत घेतले. आत असणाऱ्या विष्णू-कुबेर-गरुडा अशा मुर्तिंची माहिती देऊन, प्रत्येकाचे नाव विचारुन त्यांच्या कुटुंबीयांसाठी प्रार्थना केली. मग शांताकारं भुजगशयनं व असे थोडे श्लोक म्हणून प्रत्येकाला शांतपणे दर्शन घेऊन दिले. प्रसादाची थाळी थोडेसे काढून घेऊन परत दिली. बाहेर आल्यावर मी ३ व ह्यांनी १६ प्रदक्षिणा घातल्या. मग अन्नदान करावेसे वाटले. म्हणून ग्लुकोजबिस्किटाचे २४ पुड्यांचे पॅक विकत घेऊन Rs (१२०-) तिथल्या भिक्षेकऱ्यांना ते पुडे वाटले. इडलीला पोटात स्थान देऊन 'देवलोकात' परतलो. आज ह्यानंतर खरं तर 'औली' ला बर्फात खेळायला 'रोपवे' ने जायचा कार्यक्रम होता. पण २-३ वर्षांपासून केबलकार नादुरुस्त असल्याने ते झाले नाही.



**बद्रीकेदार**

मग आरामात आवरुन परत 'जोशी मठला' चविष्ट जेवण घेतले. आता दुसरी गाडीही दुरुस्त होऊन आली होती. मग श्री आदीशंकराचार्यांची तपोभूमी म्हणजे 'कल्पवृक्ष' व छोटी गुहा पाहिली. हा वृक्ष २५० वर्षे जुना आहे. तेथे 'अखंड ज्योत' व 'श्रीमहादेव मंदिर' आहे. हे पाहून परतताना एकदम खूपच सोसाट्याचा वारा सुटला. स्वत:ला सावरत कसेबसे गाडीत बसतोय; तर ती पण गदागदा हलू लागली. ड्रायव्हरने तशीच ती पुढे नेली.परतताना शिखांचे तीर्थस्नान 'हेमकुंडसाहीब' व 'फुलोंकी घाटीकडे' जाणारा 'गोविंद घाटकडे' जाणारा रस्ता पाहिला. तेथून हे जवळ आहे. वाटेत 'गरुडगंगा' लागली. गरुडाने येथे तप करुन अमृत मिळवले व आपली आई 'विनिता'ला सवत 'कद्रु'च्या दास्यातून मुक्त केले. येथील दगड-गोटे ठेवल्यामुळे साप त्या जागेत येत नाहीत म्हणे. खानापूरला माझ्या सासरघरी अनेकदा साप येत असल्याने ह्यांनी थोडे गोटे गोळा केले.

आता परतीचा प्रवास 'पिघलीकोटीला'. रात्रीचा मुक्काम मग परत गौचर, कौंडीव्य मार्गे हरिद्वारला ४-४।। वाजता पोचलो. 'हर की पौंडी' या प्रसिध्द घाटावर जत्रेसारख्या उसळलेल्या गर्दीतून 'वेगवती गंगेत' साखळीला धरुन गंगास्नान केले. परतताना सर्वांसाठी गंगाजळ भरुन घेतले. इकडे 'मावारबडीफालुदा' अशी एक फारच मलईदार-चवदार डिश खाल्ली. मग तेथेच जेवून 'राही मोटेल' वर रात्रीचा मुक्काम केला. १४ मे ला सकाळी ८-८।। वाजता गाडीत बसलो ते २-२।। वाजता दिल्लीत पोहोचलो. नाश्त्यासाठी या रस्त्यावर असणाऱ्या 'चितल' या प्रसिध्द रेस्टॉरन्टमधे नाश्ता केला. खूपच रम्य आहे हे हॉटेल. दिल्लीत पोचून मग मुंबईमार्गे आपल्या लाडक्या बेळगावला परतलो, ते हिमालयाच्या नितांत सुंदर स्मृतींचा खजिना घेऊनच. **(समाप्त)**

आता परतीचा प्रवास 'पिघलीकोटीला'. रात्रीचा मुक्काम मग परत गौचर, कौंडीव्य मार्गे हरिद्वारला ४-४।। वाजता पोचलो. 'हर की पौंडी' या प्रसिध्द घाटावर जत्रेसारख्या उसळलेल्या गर्दीतून 'वेगवती गंगेत' साखळीला धरुन गंगास्नान केले. परतताना सर्वांसाठी गंगाजळ भरुन घेतले. इकडे 'मावारबडीफालुदा' अशी एक फारच मलईदार-चवदार डिश खाल्ली. मग तेथेच जेवून 'राही मोटेल' वर रात्रीचा मुक्काम केला. १४ मे ला सकाळी ८-८।। वाजता गाडीत बसलो ते २-२।। वाजता दिल्लीत पोहोचलो. नाश्त्यासाठी या रस्त्यावर असणाऱ्या 'चितल' या प्रसिध्द रेस्टॉरन्टमधे नाश्ता केला.

# माझ्या आवडीचे

**सुरेश कीर्तने, मो. क्र.९४२१०५८४२५**

**मी टी शर्ट घेतला व बाहेर आलो. रस्ता ओलांडायला म्हणून थांबलो. इतक्यात पाठीवर थाप पडली, वळून पाहातो तर क्षणभर थांबलोच मी म्हणालो वश्या लेका तू! कायरे हे! तो म्हणाला दोन वर्ष झाली, माझे डोक्यावरचे सर्व केस गेले. त्याने मला घरी नेले. आम्ही चहा घेतो तोच त्याचा आठ दहा वर्षाचा नातू यश, हातात पाच सहा बॉक्सेस घेऊन आला. वहिनी त्याला म्हणाली बघू खरेदी. त्याने सर्व दाखवले. ती म्हणाली आज याचा वाढदिवस, यानेच एकट्याने सर्व खरेदी केली. हा नेहमी स्वतः आपले आपण आणतो. तिने सर्व छान बघून आणले म्हणून कौतुक केले.**

परवा मी नातवासाठी कपडे आणण्यास दुकानात गेलो होतो. त्यावेळी माझ्या शेजारी एक ५-७ वर्षाची मुलगी पण तिच्या आई बरोबर ड्रेस घ्यायला आली होती. सेल्समन त्यांना प्रथम कपडे दाखवत असल्याने, मी दुकानातील इतर गोष्टी पहात होतो. त्या मुलीने एक ड्रेस निवडला तर तिची आई म्हणाली, अगं हा तुला शोभून दिसणार नाही, फार भडक दिसतो. हा निळा किंवा तो लाल घे, तो तुला शोभून दिसेल. तसेच सेल्समन तिला दुसराच ड्रेस दाखवत होता. ती मुलगी आईला म्हणाली वाढदिवस माझा आहे, मीच माझ्या आवडीचा ड्रेस घेणार, यावेळी मी तुझे काही ऐकणार नाही. तू नेहमी तुझ्या आवडीचे कपडे आम्हाला घेतेस. मला मग ते न आवडणारे नाईलाजाने घालावे लागतात. त्या दोघींचा वाद काही संपेना व मुलगी शेवटी रडत रडत दुकानाच्या बाहेर निघून गेली.

मी टी शर्ट घेतला व बाहेर आलो. रस्ता ओलांडायला म्हणून थांबलो. इतक्यात पाठीवर थाप पडली, वळून पाहातो तर क्षणभर थांबलोच मी म्हणालो वश्या लेका तू! कायरे हे! तो म्हणाला दोन वर्ष झाली, माझे डोक्यावरचे सर्व केस गेले. त्याने मला घरी नेले. आम्ही चहा घेतो तोच त्याचा आठ दहा वर्षाचा नातू यश, हातात पाच सहा बॉक्सेस घेऊन आला. वहिनी त्याला म्हणाली बघू खरेदी. त्याने सर्व दाखवले. ती म्हणाली आज याचा वाढदिवस, यानेच एकट्याने सर्व खरेदी केली. हा नेहमी स्वत: आपले आपण आणतो. तिने सर्व छान बघून आणले म्हणून कौतुक केले. इतक्यात वसंतचा मुलगा व सून आले. मुलगा माधव म्हणाला, हे काय शर्ट व पँट अरे या रंगाचेच तुला ड्रेस आहेत की, जा बदलून आण. वहिनी म्हणाली लेका तुला साधा रुमाल निवडता येत नाही, यश ला कारे बोलतोस.? सून माधवी म्हणाली, 'अरे, यश आपणच नाही का मागच्या महिन्यात माझा असाच ड्रेस आणला?' यश म्हणाला, 'आई, याला पुढे मागे आरसे आहेत घालून पहा'. वहिनी तिला म्हणाली, 'ए का गं त्याचा हिरमोड करतेस? यश, सर्व कपडे छान आहेत'. वहिनी पुढे म्हणाली, 'मुलांना आता पासूनच स्वत:ची निवड, पसंती करायला सांगावी. म्हणजे त्यांच्यात निर्णय घेण्याची क्षमता तयार होण्यास मदत होते. पुढे द्विधा मन:स्थिती होत नाही'. वहिनी म्हणाली, 'यश, आता जादूचे प्रयोग आहेत ना? पळ'.

वहिनी तिला म्हणाली, 'का गं भवाने, परवा उषाताईंनी तुला चार साड्या दाखविल्या आणि तुझी पसंती विचारली; तर तू दुसऱ्याच पाहिल्यास आणि पसंत केल्यास दिडशे रुपये जास्तीच्या, तुझे पाहून त्या तिघींनी पण तशाच साड्या घेतल्या. या सर्व प्रकारात उषाताईंना दोन हजार जास्त खर्च आला'. माधवी म्हणाली, 'माझे चुकलेच पण दुसऱ्या साड्या पाहिल्यावर मला भानच राहिले नाही'. वहिनी पुढे तिला म्हणाली, 'आपली पसंती आपण आपल्या पैशानेच करावी. दुसऱ्यांनी दिलेल्याचे आधी मनापासून गोड कौतुक करावे. साडी ड्रेस वगैरे असेल तर आवर्जून त्याच्याकडे जाताना घालून जावे. ही माझी पद्धत आहे'. सुनेनी माझ्या सुनेची चौकशी केली. त्या दोघी वर्ग मैत्रिणी!. मी म्हणालो, 'अगं, ती पाचगणीला HRDकॉन्फरन्स आहे, त्यामुळे सकाळीच गेली आहे; त्यात तिचे प्रेझेंटेशन आहे'. तिने जीभ चावली. अरेच्या! मी पार विसरूनच गेले आणि माधवला म्हणाली, 'ए, मला पाचगणीला उद्या सोड. माझेपण प्रेझेंटेशन आहे परवा. तसेच मी पण कमिटी मेंबर आहे, मला जावेच लागणार'. माधव म्हणाला, 'ए, तू एकटीच जा. उद्या मी आराम करणार'. वहिनीनी त्याच्या पाठीत एक धपाटा घातला व म्हणाली, 'ए, ठोंब्या, नुसता बसून राहतोस व पडून राहतोस. जा तिला सोडायला आणि तिथेच रहा आणि तसेच पुढे महाबळेश्वरला जाऊन हनिमून करून या. नाहीतरी परवा तुमच्या लग्नाचा वाढदिवस आहे. येताना वाईला कुसुममावशी कडे जाऊन या. मग मी चहा वगैरे घेऊन निघालो. वसंत म्हणाला, 'थांब, मी तुला घरी सोडतो'.

घरी आल्यावर माझ्या समोर घडलेला हा प्रसंग काही केल्या जाईना. मी सहज विचार करू लागलो खरंच आपण म्हणतो, मी माझ्या आवडीचे घेईन, करेन, पण खरे पाहता ती आवड दुसऱ्याचीच असते. सकाळी आपण ब्रशने आणि पेस्टने दात घासतो, साबण अथवा शाम्पूने स्नान करतो. पण हे कोणते वापरायचे हे आपल्याला टीव्ही, वर्तमानपत्रे सांगतात. चहा कोणता

VIJAY DIWAKAR DHAVLE
MFA

CONCEPT PRINTS
THE DESIGN STUDIO

AN AESTHETIC ESSENCE TO ADVERTISING

DOMINATION IN

- Pharmaceutical Product Promotional Printed Material, Visual-Aid, Literature, Folder, Brochure
- Packaging
- Conference Printed Material
- Publication

Cell : +91 9225219040 / 9225212384 / 9225852594
Email : vdhavle@rediffmail.com

Tilak Statue, Mahal, Nagpur - 440032

Plot 118, New Dnyaneshwar Nagar,Manewada Road, Nagpur - 440027

सर्व कऱ्हाडे ब्राह्मण परिवारास हार्दिक शुभेच्छा!

# निलदिप केटरर्स

सौ. प्रज्ञा प्रकाश काणे
**दूरध्वनी : ०२५१-२४५२०५२**
**भ्रमणध्वनी : ९८१९३१२५६९**

शिवप्रतिमा मित्रमंडळ हॉल
डॉ. कामत हॉस्पिटल शेजारी, ममता हॉस्पिटलजवळ, निवासी विभाग, एम. आय. डी. सी., डोंबिवली (पू.)

घ्यायचा, काय खायचे, काय प्यायचे हे सर्व आपण थोडेच ठरवितो? या सर्व गोष्टी टीव्ही, वर्तमानपत्रे सांगतात. रेडिओवर आपली आवड म्हणून गाणी लावतात पण एखादेच आपल्या आवडीचे असते. बाकी सर्व गाणी रेडिओवर गाणी लावणाऱ्या व्यक्तिच्या आवडीची असतात. स्त्रिया साड्या घेतात आणि सांगतात मी नेहमी माझ्या पसंतीच्याच साड्या वापरते. पण सत्य परिस्थिती काय असते? या साड्या विणकराच्या आवडीच्या, डिझाईनच्या, त्याच्या आवडीच्या रंगाच्या असतात. दुकानातील सेल्समन सांगतो, बाईसाहेब ही साडी आपल्याला फारच शोभून दिसते. टीव्ही सिरिअल्स मध्ये हीच साडी .. .. या नटीने नेसली होती. म्हणून तो आपल्या अंगावर ती साडी नेसून दाखवतो. झाले! बाईसाहेब आपल्या आवडीची म्हणून तीच साडी पसंत करतात. आपले कपडे, आपले बोलणे, चालणे हे सर्व आपण टीव्ही सिरिअल्स आणि सिनेमातील नटनट्या यांचीच नक्कल करण्याचा प्रयत्न करीत असतो. पण ही सर्व मंडळीसुद्धा लेखकाने आपल्या आवडीने लिहिलेलेच बोलतात. दिग्दर्शकाच्या आवडीप्रमाणे भूमिका करतात. प्लेबॅक देणारे संगीत दिग्दर्शकाच्या आवडीप्रमाणे, चालीप्रमाणे गाणी म्हणतात. हल्ली ही मंडळी देखील चक्क उचलेगिरी म्हणजे दुसऱ्याच्या आवडीची नक्कल करतात.

यावरून असे लक्षात येईल की, आपण नेहमी म्हणतो की माझ्या आवडी प्रमाणेच करतो; पण प्रत्यक्षात मात्र दुसऱ्याच्या आवडीचे खातो, पितो, बोलतो, वागतो असे असून सुद्धा आपण आपली आवड आपल्या मुलांबाळांवर लादतो.

पण वहिनीने म्हटल्याप्रमाणेच आपली पसंती, शौक आपण आपल्या पैशानेच करावे दुसऱ्याच्या नाही. प्रत्येकाची आवड ही भिन्न असू शकते, त्यावर आपण मत व्यक्त करू नये. आपल्याला वस्तू जरी आवडली नाही तरी; तसे न दाखवता दुसऱ्याने दिलेल्याचे आधी मनापासून गोड कौतुक करावे.

परवा एक बातमी वाचली, झेरॉक्स या कंपनीने एक मशिन केले आहे. त्या मशिनच्या कॉम्प्युटरवर आपण आपल्या आवडीप्रमाणे चित्र काढायचे ते आपल्या आवडीप्रमाणे रंगवायचे झाले. त्या मशिनवर लगेच कापड प्रिंट होऊन बाहेर येते. अगदी आपल्या आवडीप्रमाणे, या पद्धतीप्रमाणे आपल्याला साड्या सुद्धा मिळू शकतील. तसेच परवा एक हॉबी वर्गाची जाहिरात वाचली. वर्ग होता स्त्रियांची कर्णफुले कशी तयार करायची? सर्व साहित्य पुरविणार, आपण आपल्या आवडीप्रमाणे डिझाईन करून कर्णफुले तयार करायची.

पण या अशा गोष्टी आपल्या आवडीच्या करणे, वाटते तितके सोपे नाही बरे! तेथे पाहिजे जातीचे.

म्हणूनच आपण धोपट मार्ग स्वीकारायचा. टीव्ही, सिनेमा, मित्र-मैत्रिणी, आई, भाऊ, बहिण, पती, पत्नी यांचीच आवड आपण आपली आवड, म्हणून स्वीकारायची. म्हणजे कोणाशीच एवढ्यावरून वाद-विवाद नकोत. माझी प्रतिमा/ छबी चांगलीच दिसायला पाहिजे.

तसेच कोणाला आवडले नाही व फार नापसंती दर्शविली; तर आपण सांगून मोकळे व्हायचे काय करणार ही त्यांची आवड! मला .. त्यांना दुखवायचे नव्हते. झाले आपण खूश/नामानिराळे !!


।। हरिहरेश्वर प्रसन्न ।।

**माऊली बिच रिसॉर्ट**

निवास व न्याहरीची उत्तम सोय
प्रो. सौ.चित्रा किरण वाकणकर
मु.पो. मारळ, हरिहरेश्वर, श्रीवर्धन, जि.रायगड - ४०२११०

(MTDC मान्यता प्राप्त)




www.mauliresot.com
०२०-२२६०४८/६९२९९०
९२२६३७४७३१/९६३७५३९०७५

पाक्षिक
**॥ आम्ही सारे ब्राह्मण ॥**
ॐ प्रकाशन
पाक्षिक नव्हे एक सामाजिक चळवळ

| | | | |
|---|---|---|---|
| वार्षिक वर्गणी | - | रू. २००/- | आजच वर्गणीदार व्हा! |
| त्रैवार्षिक | - | रू. ५००/- | |
| पंचवार्षिक | - | रू. ८००/- | |

आपण फक्त फोन करा,
वर्गणी घेण्यासाठी आम्ही आपल्याकडे येऊ!
स.नं. १/२७+२९, माऊली सोसायटी,विठ्ठल मंदिरामागे,
कर्वेनगर, हिंगणे, पुणे ४११०५२, मोबाईल:८८०५९८१६७३
email : aamhisarebrahman@gmail.com

WITH BEST COMPLIMENTS FROM
**मे. डी.व्ही. भाटवडेकर**
६४०, नारायण पेठ, पुणे ४११ ०३०,
क्लॉथ मर्चंटस्
फोन नं. - २४४५६०४७
१९१७ पासून अहर्निश सेवा


Nakhye Udyog
लग्न, मुंज, साखरपुडा, सभा, प्रदर्शन, संमेलन व
इतर कार्यक्रमांकरीता सर्व सोयींनी कॅटरींग सेवेसह
सुसज्ज हॉल.
आता वातानूकुलित
शुभमंगल कार्यालय
आणि
एव्हरेस्ट हॉल
शुभमंगल केटरर्स, एव्हरेस्ट शॉपिंग सेंटर लोकमान्य चौक,
फडके रोड, डोंबिवली (पूर्व) - ४२१२०१. फॅक्स : २४८३३५१.
फोन : २४३३१९३, ३०९१९००. संपर्क : योगेश - ९३२३१३३१९१.
एव्हरेस्ट केटरर्स, म. गांधी रोड, डोंबिवली (पश्चिम) - ४२१२०२
फोन : २४९२८६४, ३०९१८९७. फॅक्स : २४८३३५१.
संपर्क : उमेश - ९३२२२८३०३८.

# यांचेशिवाय नमस्कार तो कोणाला करावयाचा?

**अवधूत हर्डीकर, ०२०-२५३८०२०१**

**आपली वैदिक परंपरा मौखिक रीतीने हजारो वर्षे चालू राहिली. आपले सांस्कृतिक आणि धार्मिक वैभव, आपण 'जसं आहे तसंच राखायचं' ही आपली परंपरा, स्वत:ला कठोरपणे शिस्तीत राखून ज्यांनी मोठ्या श्रद्धेने पाळली, त्यामध्ये कोणतीही ढिलाई कधीही येऊ दिली नाही, अशा लोकांमधे संख्येने छोटा असलेला कऱ्हाडा समाज, आदिशंकराचार्यांच्या काळापासून गुणवत्तेमुळे ज्ञात असलेला असा समाज आहे. कागदाचा शोध लागल्यावर केवळ वैदिक संहिता कागदावर उतरल्या गेल्या आहेत दहा हजार पाचशे शहाऐंशी!**

क्षेत्रनिहाय प्रथम कऱ्हाडा आपण जुलै २०१२ च्या 'संपर्क' च्या अंकापासून अनेक क्षेत्रातले असे कऱ्हाडे की, जे त्या क्षेत्रातले पहिले तसे ठरले; अशांचा परिचय करून घेत आहोत. ही माहिती, कृपया, आपापल्या घरांतून नीट बाळगावी आणि आपापल्या पुढच्या पिढ्यांसमोर यांचे आदर्श ठेवावेत. म्हणजे गुणवंतांना सतत जन्म देणाऱ्या, सर्वस्वी प्रतिकूल परिस्थितीतून सुद्धां स्वत:च्या प्रयत्नाने स्वत:ची व स्वत:च्या घराची प्रगती, नांव करणाऱ्या अनेक स्वप्नामधल्या, कऱ्हाडा व्यक्तिमत्त्वांचे आदर्श -मुलांपुढे उभे राहतील. कृपया एवढे आपल्या पुढच्यांसाठी व्रत म्हणून करा.

१) पद्मश्री वसंत शंकर कानेटकर, नाशिक

असा पहिलाच मराठी नाटक-लेखक, ज्याने एकूण चाळीस नाटकं लिहिली आणि पुढची पन्नास वर्षे मराठी रंगभूमी गाजवली, असा सिद्धहस्त लेखक! भावुकता, नाट्यतंत्राच्या चौकटीत चपखल बसवणारा, कलेला तंत्राची चौकट ठेऊनही त्याची जाणीवही लोकांना होणार नाही याची काळजी घेणारा, नाटकं लिहितांना लोकांपुढे आपल्यातले आदर्शच वेचून, फक्त चांगलं ते निवडून तें जबरदस्त परिणामकारी भाषेत मांडणारा, तरल भावुकतेच्या ही सीमा हळुवारपणे हाताळणारा...असा लेखक शंभर-दीडशे वर्षातून एकादाच जन्माला येतो; असे वाटायला लावणारा हा प्रज्ञावान् प्रोफेसर वसंतराव कानेटकर! ख्यातकीर्त कवि गिरीश तथा शंकर केशव कानेटकरांचे चिरंजीव! वडिलांपेक्षाही दोन पावलें पुढे जाऊन कीर्ती मिळवलेला सुपुत्र!

मराठी साहित्य आणि मराठीतील लेखनात स्वत:च्या नावाचा दबदबा निर्माण केलेला,'कानेटकर ईरा' मराठी नाट्यलेखनात, स्वयंभू कर्तृत्वाने निर्माण करणारा गुणवंतांचा अग्रणी लेखक! कानेटकरांची खूपशी नाटके दुसऱ्या एका गुणवान-स्वयंभू-नाट्यधर्मी कऱ्हाडा व्यक्तीने स्टेजवर आणली. त्यांचं नांव प्रभाकर पणशीकर! ज्यांच्या नांवावर उत्तम नटासाठीचे एक लाख रुपयांचे 'प्रभाकर पणशीकर ॲवार्ड'-२००६ पासून महाराष्ट्र शासन देऊ लागले आहे. वसंत कानेटकरांना उपमान म्हणून ठीक वाटेल असा, तुलनेसाठी कोणीही त्यापूर्वीच्या काळातला एवढा सूक्ष्म भावस्पर्शी गुणी नाटक-लेखक मराठी मध्ये दिसत नाही. अत्यंत गहिरे, गुंतागुंतीचे माणसां-माणसातले नाजूक संबंध, अत्यंत योग्य अशा सुगंधी शब्दमालेमध्ये गुंफणारा हा ताकतीचा लेखक; मोरोपंत पराडकरांच्या भाषेत सांगायचे तर ''झाले बहु, होतिल बहु, आहेतही बहु, - परंतु यासम हा'' या योग्यतेचा नाट्यलेखक! माणसांच्या वार्तनिक प्रकारांतले नवीन सुखावणारे नॉर्मस् नाटकांमधून समाजापुढे ठेवणारा आणि त्याकरिता सर्वस्वी अभिनव अशी स्वत:ची सादरीकरणाची शैली निर्माण करणारा हा 'कानेटकर ईरा'='कानेटकर -पर्व'-स्थापक वसंत कानेटकर! पुढच्या मोठ्या काळासाठीचा दीपस्तंभ! मराठी नाट्यविश्वाचे त्रि-मुनी अण्णासाहेब किर्लोस्कर, भालचंद्र पेंढारकर, प्रभाकर पणशीकर- यांच्याबरोबरच हे एक नाव - तिन्ही मुनींपेक्षा वेगळा चवथा मुनी! श्रेष्ठ तत्त्वचिंतक! टाळायचे म्हटले तरी, ही नांवे टाळतां येत नाहीत.

२. पं. भालचंद्रशास्त्री करंबेळकर, कणकवली, पुणे

आपली वैदिक परंपरा मौखिक रीतीने हजारो वर्षे चालू राहिली. आपले सांस्कृतिक आणि धार्मिक वैभव, आपण, जसं आहे तसंच राखायचं' ही आपली परंपरा, स्वत:ला कठोरपणे शिस्तीत राखून ज्यांनी मोठ्या श्रद्धेने पाळली, त्यामध्ये कोणतीही ढिलाई कधीही येऊ दिली नाही, अशा लोकांमधे संख्येने छोटा असलेला कऱ्हाडा समाज, आदिशंकराचार्यांच्या काळापासून गुणवत्तेमुळे ज्ञात असलेला असा समाज आहे. कागदाचा शोध लागल्यावर केवळ वैदिक संहिता कागदावर उतरल्या गेल्या. परंतु पठण पद्धतीसाठी सोयिस्कर अशा वेदपठणाच्या इतर पद्धति लिहून काढण्याची

वेळ खास, त्रासदायक आणि जटिल अशी कार्यपद्धति कोठेही नव्हती. सर्वात मोठा ऋग्वेद, त्यामध्ये मंत्र आहेत दहा हजार पाचशे शहाऐंशी! शब्दांची संख्या एक लाख अठ्ठावीस हजार यांना 'पद' असे म्हणतात. आणि अक्षरे चार लाख बत्तीस हजार - संहिता आणि पदे याशिवाय 'जटा', 'क्रम', आणि 'घन' या एकापेक्षां एक जटिल पद्धती वेदपठणामध्ये परंपरेमध्ये होत्या. या सर्व पद्धतींवर हुकमत असलेले लोक कऱ्हाडा समाजामध्ये इतिहास काळापासून गुणवत्ता, स्वरमाधुरी; संख्या या सर्वच दृष्टीने इतर सर्व समाजांच्या पुढे आहेत. असे एक घनपाठी श्री. भालचंद्रशास्त्री करंबळेकर यांनी या सर्व पद्धती- लिखाणाचे काम हाती घेतले. एक मंत्र म्हणण्यासाठी वीस सेकंद लागतात आणि त्याचाच घन म्हणण्यासाठी नऊपट वेळ म्हणजे एकशे ऐंशी सेकंद लागतात. हे लिहिण्याचे अति किचकट काम करण्यासाठी कोणतीही आर्थिक मदत कोठूनही नसतांना, धैर्य, चिकाटी, श्रद्धा, ज्ञान, भक्ति, प्रचंड श्रम घेण्याची मानसिकता अशा अनेक सद्‌गुणांच्या राशी लागतात. या कामाकरितां कोणी प्रशंसक नसतो, कौतुकाचे शब्द नसतात. पैसा तर नसतोच. असे कार्यकर्ते ज्या समाजात ठायी ठायी होते अशांना सदैव नमस्कार करायलाच हवा. हे काम हातांत घेणारे पं. करंबेळकर पहिलेच!

३. पद्मभूषण -श्री विष्णू सखाराम खांडेकर, शिरोडा, कोल्हापूर

'एप्रिल २०११' च्या, 'संपर्क' याच त्रैमासिकामध्ये याच शीर्षकाखाली; खांडेकरांवर स्वतंत्र लेख आहे. 'ज्ञानपीठ' पारितोषिकाने १९७६ साली खांडेकरांना गौरविले., १९६८ साली 'पद्मभूषण' पुरस्कार, १९७० साली साहित्य अकॅडमीची 'फेलोशिप',... वगैरे माहितीचा माझा लेख यांचेवरच आहे. श्री.विष्णू सखाराम खांडेकर, हे 'ज्ञानपीठ' पुरस्कार मिळवणारे पहिले मराठी साहित्यिक! त्यांची ओळख मराठीतले पहिले लघुनिबंधकार अशीही आहे. साहित्य काव्य.. इत्यादि कला शेवटी मानवी जीवनासाठी आहेत. माणसाचे भावजीवन समृद्ध करण्यासाठी आहेत. कोणताही कला-प्रकार परंपरेने मानवी भावजीवन श्रीमंत करीत आलेल्या, व्यक्तीच्या कल्पना-विश्वाची मनोहारी निर्मिती आहे; आणि अशी निर्मिती ही बुद्धिपूर्वक करावी लागणारी गोष्ट आहे. ती आपसूक होत नाही. हा कलेला आवश्यक असणारा मानवी बुद्धीचा संबंध स्वार्थी असेल, तर कलेतून मिळणाऱ्या फायद्याचा विचार प्रबळ असतो. हा फायदा पैसा व कीर्ती दोन्ही बाबत असतो आणि स्वार्थी नसेल, तर त्या निर्मितीचा हेतू भव्य-दिव्य असतो. मानवी भावजीवन, भव्य-दिव्य करून टाक़ण्याचा असतो. मानवी जीवनात मांगल्य आणण्याचा असतो. कला ही मानवी-भावजीवन किंवा एकूणच जीवन उत्तम बनविण्यासाठी असेल, तर कला हे साधन ठरते. तें ही उत्तम-मंगलमय अशा व्यक्ति जीवनासाठीचे साधन. खांडेकरांच्या संपूर्ण साहित्यामधे हीच दृष्टी दिसते. परंतु हाच हेतु मनात धरून त्यांनी मुद्दाम लेखन केले असे म्हणवत नाही. घराण्याच्या परंपरेने श्रीमंत केलेल्या मानसिकतेमुळे जो त्यांचा स्वभाव झाला होता, तोच इतका श्रेष्ठ दर्जाचा होता की त्यांचे साहित्य, म्हणजे, त्यांची कथा-कादंबरी, काव्य-नाटक, पटकथा-विनोद, व्यक्तिचित्रे अशा बहुविध आयामात त्यांच्या साहित्याचे प्रतिबिंब होते, असे म्हणता येईल.

या मानसिकतेत आपल्या परंपरेच्या उत्तम दर्जाच्या मानवी सद्‌गुणांवर प्रेम, श्रद्धा, जिव्हाळा आणि एकूणच मानवी जीवनावर सरळ-स्वच्छ प्रेम. त्यांत दांभिकतेचा स्पर्शही नव्हता, तर पारदर्शी अंत:करणाचं दर्शन होते. उच्च दर्जाची पर-संवेदना होती. खांडेकर खऱ्या अर्थाने सहृदय-सम्राट् होते. म्हणून त्यांच्या साहित्यात, जीवनाच्या मांगल्यांत न्हाऊन निघालेली बाळसेदार रोपटी ठायी ठायी दिसतात. तामिळनाडू सारख्या प्रांतातून काही लोकांनी आपल्या मुलांची नांवे 'खांडेकर' ठेवलेली मी वृत्तपत्रांत वाचली. त्यांच्यावर भारत सरकारने पोस्टल स्टँप काढला. शिवाजी विद्यापीठाने त्यांना डी-लिट् दिली. कवी किंवा साहित्यिकांसाठी मराठीत रूढ झालेला 'लेखक' हा शब्द, संस्कृत मधल्या 'मनीषी' म्हणजे 'चिंतनशील व्यक्ती' हा अर्थ दाखविण्यात किंवा उर्दूमधला 'शायर' या शब्दाच्या अर्थाची श्रीमंती दाखविण्यात कमी पडतो. चिंतनशील व्यक्तीच्या तोंडून, वेगात बाहेर पडणारे संपन्न विचारधन पटपट लिहून घेत जाणारा 'लेखक' असतो. त्यातही सच्चिदानंद बाबा हे ज्ञानेश्वरीचे लेखक- स्वत:ला सामान्य लेखक या अर्थाचा 'लेखकु' असा शब्द वापरतात. खांडेकर असे लेखकू किंवा लेखकही नव्हते. ज्यांच्या विचारधनाला आपण साहित्य म्हणतो; असे हे सर्वश्रेष्ठ मनीषी साहित्यिक होते. अशा चिंतनशील व्यक्तीच्या निरामय आणि सर्व काळासाठी हितकारक ठरणाऱ्या विचारांना, सर्वसामान्य व्यक्तीनीही झटकन स्वीकारावे या करतां कला काम करते. म्हणजे असे मानवी जीवनासाठी आवश्यक असणारे श्रीमंत विचार स्वीकार्य बनविण्याचे काम कला करते आणि त्यासाठीच ती हवी आहे. विचार, स्वीकार्य बनविण्याचे कला हे साधन आहे. साध्य नव्हे. म्हणून तारुण्यातल्या थोड्याशा काळासाठी, माणसाच्या स्वाभाविक उच्छृंखल भावना चाळविण्यासाठी नव्हे; तर, कोणत्याही देशात कोणात्याही काळात, असलेल्या नागरिकांना, त्या साहित्यिकाच्या किंवा कवीच्या विचारांचा उपयोग, त्यांच्या स्वत:च्या वैचारिक जाणिवा संपन्न करण्यात किती झाला? त्या जाणिवांची उंची वाढविण्यासाठी कितपत झाला? यावर साहित्याची किंवा काव्याची स्वीकार्यता अवलंबून असते. खांडेकर, दुर्गा भागवत, भा.रा.तांबे, इंदिरा संत, वसंत कानेटकर, अनंत शेवडे, मोरोपंत पराडकर, काटदरे, ग.दि. माडगूळकर, मर्ढेकर, सुरेश भट, सुधीर मोघे यांसारख्या उच्च दर्जाच्या साहित्यिकांचे आणि कवींचे देश-कालातीत असे महत्त्व याचमुळे आहे. टोळी कल्चरचा वापर करून, गुणवान लोकांना अनुल्लेखाने मारून, त्यांना मिळणाऱ्या सन्मानामध्ये अडथळे निर्माण करून, त्यांचे नांवही कोठे येणार नाही. अशी व्यवस्था करून, आपण फक्त जे प्रदर्शित करु पहातो, ते म्हणजे आपली विषाक्त संस्कृती! घरावर दगड

पडण्याने नुकसान होते खरे, पण ते कोठून येताहेत; हे जाणून घेणाऱ्या लोकांना जे चेहरे समजतात; ते समाजाचे हे रूप कोणी बिघडवलंय हे सांगायला सदैव सिद्ध असतात. 'हे वाईट आहे' असे खाली मान घालूनही समाजातला एकही मान्यवर बोलत नाही. या गोष्टी, समाजाच्या सांस्कृतिक उणेपणाच्या निदर्शक ठरतात. म्हणूनच ज्या कोल्हटकरांनी ना.सी.फडके यांना 'युगपुरुष साहित्यिक' म्हणून गौरविले. त्यांनीच नंतर 'सोबत' मध्ये मोठी लेखमाला लिहून फडके, तसे नव्हतेच हे सिद्ध केले. ग.त्र्यं माडखोलकरांनी केशवसुतांचे केलेले कौतुक, त्या कौतुकाला ते पात्र नव्हते; असे मागाहून स्पष्ट लिहून त्यांनीच स्वत:चे पूर्वीचे मत खोडून काढलेले दिसते.

हे घाणेरडे राजकारण सांगणाऱ्या गोष्टी, ठेंगू लोकांच्या सावल्या, काही वेळा कशा मोठ्या होतात ते जाणून घ्यायला ठीक आहेत; त्यामुळे सांस्कृतिक विश्वाची नकारात्मक बाजू, कशी व कोणत्या कारणांमुळे खूप काळ रेंगाळत होती तेही कळते... त्याचबरोबर हेही समजते; की असे प्रयत्न कितीही झाले तरी समाजामध्ये, चांगले काय व वाईट काय हे कळू शकणारी माणसे सर्व स्तरांमध्ये सर्व काळात असतात. आणि समाजावर चांगल्याचा परिणाम दीर्घकाळ रहातो. आपल्या मूळच्या संपन्न अशा सांस्कृतिक वातावरणाला पोषक अशा विचारांचे आदर्श म्हणून ज्यांचे अनुकरण होत आले असे वामन पंडित, संत ज्ञानेश्वर, संत रामदास, संत तुकाराम, मोरोपंत यांच्या सारख्यांचेच विचार त्यांच्या रचनांच्या अभ्यासासह लोकांच्या मनावर राज्य करीत रहातात. तीच गोष्ट खांडेकर, दुर्गा भागवत यांच्या सारख्यांची !!

श्री. विष्णू सखाराम खांडेकर यांनी, आमच्यामध्ये या जीवनांत, उत्तम विचारांनी युक्त असे संपन्न जीवन जगण्याची आशावादी दृष्टी निर्माण केली. आमच्या साऱ्या दोषांकडे पहाण्याची माणुसकीच्या आधारावरची संताला शोभणारी दृष्टी दिली. थोडा वेळ टिकणाऱ्या चंचल भावनांना न कवटाळता, मानवतेला जवळ करणारे, खरेखुरे, दीर्घजीवी, उदात्त, श्रेष्ठ आणि माणसाला सर्व काळासाठी आंतूनच मोठे करणारे करुणा, दया, दंभरहित आपुलकी असे भाव आपल्यामध्ये कसे बाणवावयाचे, याचे शिक्षण आम्हांला खांडेकरांच्या वाङ्मयात मिळते. निराशेने युक्त, ढेपाळलेले असे कुरूप जीवन जगण्यापेक्षा, माणसाचे जीवन त्याची भव्य-दिव्यता आंतूनच संपन्न करणारे विचारधन घेऊन, आपले जीवन श्रीमंत करायला त्यांनी शिकवले.

खांडेकरांच्या दुर्दैवाने त्यांना मिळणाऱ्या प्रत्येक सन्मानात अडथळे आणणारे लोकही ठसठशीतपणे लक्षात राहिले. 'ज्ञानपीठा'चा सन्मान स्वीकारतांना, तो राष्ट्रपतींच्या हस्ते आपणाला मिळावा यासाठी प्रयत्न करणाऱ्यांना, राष्ट्रपती डॉ. राधाकृष्णन् यांनी बाजूला सारून, खांडेकर ज्या खुर्चीवर बसले होते तिथे जाऊन, त्यांनी खांडेकरांना सन्मानित केले. मोठ्या लोकांचा मोठेपणा, आमच्या दहाफूट वाढवलेल्या, सुजेसारख्या असलेल्या अहंकारालाही ठेंगू ठरवीत पराभूत करतो; हे दिसून आले!

खांडेकरांच्या नंतर, शिरवाडकरांना कांही वर्षांनी ज्ञानपीठ पुरस्कार मिळाला आणि बरीच वर्षे मराठीसाठी 'ज्ञानपीठ' पुरस्कार मिळाला नाही. बरीच वर्षे कुजबुजत राहिलेली वाणी; मुलाखती, लेखांतून काही ठिकाणी प्रकटरूप घेऊ लागली. अशावेळी शास्त्र असते; ते एकच व ते म्हणजे, ज्यांना 'ज्ञानपीठ' मिळाले ते त्याला तेवढे ते पात्र नव्हते. हे मुलाखत तंत्राद्वारा सांगणे! वरवर पहातां अशी चमकदार विधाने दुष्टतेच्या व्रतपालनापोटी असतात; हे लोकांना कधीचेच कळलेले आहे. ही गोष्ट वेगळी! पण संस्कृतीच्या उणेपणालाही परंपरेची धार असते; हे यामुळे दिसून आले!

४. बॅरिस्टर बाळ गंगाधर खेर, रत्नागिरी-मुंबई

त्यावेळच्या विशाल मुंबई राज्याचे, ज्यामध्ये महाराष्ट्र व गुजराथ दोन्ही राज्ये होती; अशा राज्याचे पहिले मुख्यमंत्री आणि नंतर ब्रिटनमध्ये भारताचे अम्बॅसेडर म्हणून कार्य केलेले. बाळासाहेब खेर ही व्यक्ती विद्वत्ता, ऋजुता, साधेपणा सचोटी, सरळपणाचे व्यवहार, त्याचवेळी शिस्तशीर व्यवस्थापन, प्रसिद्धी पासून चार हात दूर रहाण्याचा स्वभाव, आणि विकासोन्मुख कामे करण्याची हातोटी याकरतां कायमच लक्षात रहातील. भारतरत्न पं. गोविंद वल्लभपंत पराडकर हे विशाल उत्तर प्रदेशाचे मुख्यमंत्री तर बाळासाहेब खेर हे विशाल मुंबई राज्याचे मुख्यमंत्री ही दोन्ही कऱ्हाडा व्यक्तिमत्त्वे एकाच वेळी भारताच्या दोन विशाल राज्यांचे मुख्यमंत्री म्हणून होते... महाराष्ट्राच्या, एका, नंतर आलेल्या मुख्यमंत्र्यांच्या मातुश्री सुद्धा कऱ्हाडाच होत्या, असो.

प्रत्येक क्षेत्रात कऱ्हाडा असा सर्वातिशायी होत असल्यामुळे, त्यांना लहानपणीच बाद करण्याचे प्रयत्नही होत असतात. ते प्रयत्न अनेकदा गुप्तपणे चाललेले असतात, तर कांही वेळेला ते बटबटीतपणे पुढे येतात. प्रत्येक क्षेत्रात वरताण करणारे कऱ्हाडे त्याला जबाबदार आहेत. असे एक गृहस्थ विनोदाने एकदा म्हणाले; आणि ते खरेही आहे. बाळासाहेब खेर हे पहिले गांधीवादी विचारसरणीचे नेहरू आणि पटेलांना मान्य झालेले मुख्यमंत्री! ते ज्यावेळी निवर्तले त्यावेळी त्यांचे नांवे कर्ज होते. एम.ए. ला त्यांना पहिले आल्यामुळे मुंबई विद्यापीठाचे 'झाला वेदान्त पारितोषिक' मिळाले होते. रत्नागिरीच्या चालुक्यांच्या काळांत बांधलेल्या मोठ्या किल्याचे त्यांचे पूर्वज किल्लेदार होते... ते मुख्यमंत्री असेपर्यंत खेर आडनांवाच्या कोणालाही, कोणताही, ज्याला ते योग्य होते; असा शासकीय लाभ झाला नाही. त्यांच्या जातीच्या श्री. तांबे नांवाच्या अत्यंत हुषार विद्यार्थ्याला डेप्युटी कलेक्टर, म्हणून निवड होऊनही या पदावर जाता आले नाही. धारवाडचे दादासाहेब पावटे हे त्यांचे सेक्रेटरी होते. त्यांनी या गोष्टींचा आदरपूर्वक उल्लेख केला आहे. रत्नागिरीचे स्वत:चे मोठे घरसुद्धा त्यांनी हरिजन सेवासंघाला दिले.. यांच्याकडून अनेकांनी आपली कामे केली. पण यांच्या नांवाने कोणीही कौतुकाचे चार शब्दही बोलला नाही. खेरसाहेब, तुमच्या स्मृतींना अनंत नमस्कार! आपल्या शिवाय, नमस्कार तो कोणाला करायचा?...

*With Best Compliments from,*

**Reindeer Apparels**

for
jerkins and jackets

**Manini Gurjar**

1275, Shukrawar Peth,
Neha Apartments,
Subhash Nagar, L.No. 6,
Pune - 411 002

**Phone : 020-24476336, 24483225**
**Fax : 020-24454787**
E-mail : dispomed@vsnl.com

**With Best Compliments**

# Dynamic Engineers

**7/2 Behind K.E.B Power Station**
**Udyambag – BELGAUM**
**590008**

**CMFRS. mechanical**
**(Railway) Jacks**

**P.M. Puranik**
**09448480607**



संस्थापक
कै. वासूदेव महादेव जावडेकर

# सातारी पेढा शॉप

स्थापना-१९३६



**मशहूर**

सातारी पेढे
काजू बर्फी
आंबा बर्फी
गुलकंद बर्फी
श्रीखंड वडी

**चटकदार**

फरसाण
स्पेशल चिवडा
सुकामेवा
खारा काजू
चटणी वगैरे

श्रीखंड आणि चक्का

**पौष्टीक खाद्य भांडार**

अभ्यंकर रोड, सीताबर्डी, नागपूर–440012, फोन : 0712–2525704



आपला मुलगा/मुलगी
देशाबाहेर आहे का ?
**इंटरनेट** वरून
त्यांना संपर्क करताना
त्रास होतो ?

आम्हाला कॉल करा
आम्ही आपला त्रास
स्वस्त दरात कमी करू.



**SDS ENTERPRISES**

**Sales**
- Desktop
  - a. Branded
  - b. Assembled
- Laptops
- Tables
- Printers
- Accessories

**Repairs**
- Desktop
- Laptop
- Accessories

**Solutions**
- On Internet
- Network
- Web
- Annual Maintenance
  - a. Desktop
  - b. Laptops
  - c. Network
  - d. Printers

संपर्क
**Shantanu Gurjar**
**9890990112**
**9326209282**
shantanu@sdsenterprises.net

**ऋणानुबंध घराण्यांचे, संस्कार पिढ्यान् पिढ्यांचे**

(व्यवस्थापन)

# श्री अन्नपूर्णा केटरर्स

(समर्थ डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन यांच्या मालकीचे)

# श्रुति मंगल कार्यालय

आमचे मार्गदर्शक व आमचे सद्गुरू

**।।श्री दिगंबरदास महाराज।।**

यांच्या आशिर्वादाने श्रुति मंगल कार्यालयानं मंगल कार्याची परंपरा निर्माण केली व जपली आहे. विवाह, मौंजीबंधन अथवा कोणताही समारंभ या सर्वांतून दृग्गोचर होते घराणे व सुसंस्कृतपणा हा समारंभ संपन्न करणाऱ्या परिवारांचा. अशा साजऱ्या होणाऱ्या समारंभासाठी सुयोग्य वास्तू उपलब्ध करून देणे जिला असेल पावित्र्य मंदिराचे, जेवण असेल अन्नपूर्णेचे, सौंदर्य असेल वास्तूरचनेचे, सुख असेल आधुनिकतेचे हेच श्रुति मंगल कार्यालयाचे 'ध्येय'. बाकी कार्य सिद्धीस नेण्यास श्री समर्थ आहेतच.

## मंगल कार्यासाठी दोन स्वतंत्र हॉल

**दुर्गा हॉल** : पहिला मजला – ३६०० चौ. फुट

वधू–वर पक्षासाठी प्रत्येकी २ खोल्या

**जानकी हॉल** : दुसरा मजला – ३६०० चौ. फुट

वधू–वर पक्षासाठी प्रत्येकी २ खोल्या (टेरेस १००० चौ. फुट)

सर्व खोल्या सेल्फ कन्टेन्ड, प्रशस्त पार्किंग, हवेशीर, भरपूर उजेड, मध्यवर्ती, उत्कृष्ट भोजन, उत्तम वाढप व्यवस्था, लिफ्टची सुविधा, शिवाय दोन मोठे जिने हे सर्व अत्यंत वाजवी दरात

SHREE ANNAPURNA CATERERS

# श्री अन्नपूर्णा केटरर्स

श्री. प्रभाकर र. काजरेकर

# श्रुति मंगल कार्यालय

१२३६, आपटे रस्ता, डेक्कन जिमखाना, पुणे – ४११ ००४

दूरध्वनी : ०२०–२५५३१७४९, २५५२१४४० फॅक्स : ०२०–२५५२१९९८

Website : www.shrutimangal.com E-mail : hrishikesh@shrutimangal.com

# ‘कॅन्सर माझा सांगाती’

सौ. आरती अ. हळबे.

**शब्दांकन – श्री. अविनाश हळबे**

**(क्रमशः पुढे चालु)**

आजवर मी ६०० पेक्षा जास्त कॅन्सरग्रस्त आणि त्यांच्या कुटुंबियांना समुपदेशन करुन, या व्याधीशी यशस्वी सामना करुन जगण्याची, नवी जिद्द निर्माण करण्याचे काम केले आहे. याशिवाय त्यांना कोणत्याही वेळी गरज पडली तर, संपर्क साधता यावा म्हणून मी माझा मोबाईल २४x७ सतत अखंड चालू ठेवून, एक हेल्पलाईनही उपलब्ध करुन दिली आहे. अगदी मध्यरात्रीही पेशंट वा घरच्यांना अस्वस्थ वाटू लागले तरी ते माझ्याशी संपर्क साधून आपला ढासळलेला आत्मविश्वास परत मिळवू शकतात. गरजूंना औषधे आणि उपचार यात मदत मिळवून देण्यातही मी प्रयत्नशील असते. त्यासाठी ‘गॅलक्सी’च्या डॉ. शैलेश यांपासून वॉर्डबॉईजपर्यंत सर्वांचे भरघोस सहाय्य मिळते. काही सेवाभावी मंडळी व संस्थाही आता माझ्या मदतीसाठी पुढे येत आहेत. कोणावर ही वेळ न येवो, पण तशी परिस्थितीच निर्माण झाली तर, संबंधितांनी माझ्या ९९२२०८४७०० या हेल्पलाईनचा उपयोग करुन घ्यावा. हे सर्व करत असताना कॅन्सरबाबात असणारे अनेक गैरसमज दूर करुन, मला वस्तुस्थिती नीट समजाऊन सांगावी लागते. त्यापैकी काही मी सर्वांच्या माहितीसाठी देत आहे.

१)कॅन्सर हा कोणत्याही प्रकारचा संसर्गजन्य रोग नाही. त्यामुळे घरातल्या एखाद्याला तो झाला तरी, दुसऱ्याला त्याची लागण होणे असंभव आहे. या रुग्णाबरोबर दैनंदिन व्यवहार करण्यास काहीच हरकत नाही.

२) ‘कॅन्सर म्हणजे मृत्यू’ हेही खरे नाही. आजकाल निरनिराळ्या प्रकारच्या कॅन्सरवर अनेक प्रभावी वैद्यकीय उपाय उपलब्ध आहेत. वेळीच उपचार झाले तर तो, निश्चितच आटोक्यात येऊ शकतो.

३) कॅन्सर होण्यापाठीमागे कोणतेही विविक्षित कारण सांगता येत नाही. पण आजकालची धकाधकीची जीवनशैली, चौरस आहार / व्यायामाचा अभाव, व्यसनाधीनता, घर किंवा व्यावसायिक ताणतणाव यांमुळे



त्याचे प्रमाण वाढत चालले आहे हे मात्र खरे.

४) तंबाखू, गुटखा, धूम्रपान यांमुळे तोंड अथवा घशाच्या कॅन्सरला आमंत्रण मिळते.

५) कॅन्सरवर ॲलोपॅथीबरोबर आयुर्वेद, होमिओपॅथी उपचार घेण्यास हरकत नाही. तज्ञ डॉक्टरांच्यामार्फत त्याचा अवश्य लाभ घ्यावा.

६) कॅन्सरवरचे इलाज तज्ज्ञांमार्फतच करावेत. ऐकीव माहितीवर अवलंबून न रहाता तातडीने वैद्यकीय उपचार सुरु करावेत. उपचारास वेळ लागल्यास तो पुढे पसरत जातो.

७) आपल्या आराध्यदैवतावर पूर्ण श्रद्धा असावी. नामस्मरण, पूजापाठ, प्रार्थना, ध्यान यांचा आत्मिक बळ वाढविण्यास निश्चितच उपयोग होतो. परंतु वैद्यकीय उपचारात कोठेही कमतरता करु नये.

८) कॅन्सरच्या रुग्णाला वैद्यकीय उपचाराबरोबर मानसिक आधाराची नितांत आवश्यकता असते. हा आधार नीट मिळाला तर, तो रुग्ण लवकर त्यातून बाहेर येऊ शकतो.

९) कॅन्सरवरील वैद्यकीय उपचाराबरोबर ‘मी यातून पूर्णपणे बरा / बरी होणार आहे’ ही सकारात्मक विचारसरणी अत्यंत फलदायी होते.

१०) स्त्रियांनी मॅमोग्राफी ही तपासणी चाळीशीनंतर दरवर्षी करुन घ्यावी. कॅन्सर रुग्णांनी बरे झाल्यानंतरही डॉक्टरांच्या सल्ल्याने ठराविक कालाबधीनंतर तपासण्या सुरु ठेवाव्यात.

११) कॅन्सर = उरक + सर. उरक म्हणजे

**या व्याधीशी यशस्वी सामना करुन जगण्याची, नवी जिद्द निर्माण करण्याचे काम केले आहे. याशिवाय त्यांना कोणत्याही वेळी गरज पडली तर, संपर्क साधता यावे म्हणून मी माझा मोबाईल २४X७ (सतत)अखंड चालू ठेवून, एक हेल्पलाईनही उपलब्ध करुन दिली आहे. अगदी मध्यरात्रीही पेशंट वा घरच्यांना अस्वस्थ वाटू लागले तरी ते माझ्याशी संपर्क साधून आपला ढासळलेला आत्मविश्वास परत मिळवू शकतात. गरजूंना औषधे आणि उपचार यात मदत मिळवून देण्यातही मी प्रयत्नशील असते. त्यासाठी ‘गॅलक्सी’च्या डॉ. शैलेश यांपासून वॉर्डबॉईजपर्यंत सर्वांचे भरघोस सहाय्य मिळते. काही सेवाभावी मंडळी व संस्थाही आता माझ्या मदतीसाठी पुढे येत आहेत.**

# PRD - 7 & PRD - 10

## PROVEN RADIAL DRILLING MACHINES

from PHI Belgaum

**'Today's Strong & Versatile Machines'**

TÜV SUD ISO 9001

iso - 9001 2008

| | | PRD-7 | PRD-10 |
|---|---|---|---|
| Drilling Capacity in M.S. | | | |
| Max Distance between | | | |
| spindle centre to column centre | mm | 25.4 | 32 |
| Maximum | mm | 585 | 650 |
| Minimum | mm | 285 | 300 |
| Maximum Distance (Spindle nose to base) | mm | 533 | 660 |
| Travel of Spindle | mm | 125 | 125 |
| Spindle Speeds nos. / range | rpm | (8)75-1850 | (8) 80-2310 |
| Vertical adjustment of arm | mm | 533 | 660 |
| Travel of Drill Head | mm | 250 | 250 |

PHI

## PRAKASH HOME INDUSTRIES

Near Rani Chennamma Nagar, IInd Stage, 695C, Udyambag P.O.,
Belgaum - 590 008 **Ph. :** 0831-2441626, 2442390
**Fax :** 0831-2445026 **E-mail :** phibgm@dataone.in



सर्व कऱ्हाडे ब्राह्मण
परिवारास
हार्दिक शुभेच्छा!

काटदरे

सर्व कऱ्हाडे ब्राह्मण
परिवारास
हार्दिक शुभेच्छा!

## चोखंदळ ग्राहकांची पहिली पसंती

**स्वादिष्ट चवींचा सुवर्णमहोत्सव साजरा करणारे काटदरे मसाले आता आपल्याही शहरामध्ये उपलब्ध**

**ए-वन कांदा लसूण मसाला, खमंग चटण्या, चटकदार लोणची, उपवासाची पिठे व भाजण्या, इनस्टंट मिक्सेस, केशरयुक्त दूध मसाला, ताक मसाला, मिसळ मसाला इ.**

वितरक नेमणे आहेत.

# काटदरे फूड प्रॉडक्ट्स प्रा. लि.,

**जे२/१७, ॲडिशनल एम. आय. डी. सी., सातारा - ४१५ ००४**

**Customer Care No. (02162)240678**
**E-mail : katdare_masala@yahoo.co.in**

करु शकणे आणि सर म्हणजे जिंकणे. याचाच अर्थ कॅन्सरला आपण जिंकू शकतो! एक ना अनेक, माझे काम चालूच आहे आणि चालूच राहणार आहे. मध्येच शरीरात एखादी छोटी समस्या निर्माण झाली तर, मला कॅन्सरचा रिकरन्स झाल्याची संभावना होते. डॉक्टरी तपासण्या होऊन रिपोर्ट मिळेपर्यंत घरातल्या सगळ्यांचाच जीव टांगणीला लागतो. एक दिवस कळते, की तपासणीतून वेडेवाकडे काही निघाले, नाही म्हणजे उद्‌भवलेली समस्या ही कॅन्सरची नाही. मग मी हसते व पुन्हा नव्या जोमाने काम करु लागते. सकारात्मकतेकडे आणखी एक पाऊल. 'कॅन्सर' हा शब्द उच्चारला, की कोणालाही समोर स्मशानच दिसते. पण परमेश्वरावरील श्रद्धा, मनातली सकारात्मकता आणि त्याला चांगल्या समुपदेशनाचा आधार मिळाला, की त्या स्मशानाचेही रुपांतर नंदनवनात करता येते, हा माझा अनुभव आहे. फरक फक्त त्याकडे बघण्याच्या दृष्टीचा आहे. एक शायर म्हणतो–

**सोचके बदलो सितारे बदल जाएंगे, नजरको बदलो नजारे बदल जाएंगे**
**कश्तियाँ बदलनेकी जरुरत नही, दिशाओंको बदलो किनारे बदल जाएंगे**

एकेकाळी माझे मन कॅन्सरच्या आघाताने उन्मळून पडले होते. पण परमेश्वरावरील श्रद्धा, कुटुंबीय, शेजारीपाजारी, डॉक्टर मंडळी व सपोर्ट ग्रुपच्या सकारात्मकतेने त्याला नवी उभारी आली. त्याचा प्रभाव इतका होता, की अनेक दुर्दैवी स्त्रीपुरुषांच्या आयुष्यात,नवजीवन फुलविण्याचे सामर्थ्य माझ्यात आले!एक काळ असा होता, की कॅन्सर माझ्याच वाट्याला कां आला असा प्रश्न मी माझे दैवत श्रीगजानन महाराजांना कळवळून विचारला होता. पण आता चेहऱ्यावर मृत्यूची छाया घेऊन, आलेल्या पेशंट आणि त्याच्या नातेवाईकांना काउंन्सिलिंग केल्यावर जेव्हा, मला त्यांच्यात जगण्याचा आत्मविश्वास आणि नवजीवनाचे हास्य विलसताना दिसते तेव्हा, असे वाटू लागते आहे; की बरे झाले महाराजांनी कॅन्सर माझ्या वाट्याला दिला, नाहीतर इतक्या लोकांमध्ये जगण्याची जिद्द निर्माण करुन त्यांचा दुवा – आशीर्वाद संपादन करण्याची संधी मला कशी मिळाली असती? महाभारतातला एक श्लोक याबाबत खूप बोलका आहे.

'न त्वहं कामये राज्यं, न स्वर्गं, नपुनर्भवम्
कामये दुख:तप्तानां प्राणीनां आर्तनाशनम्'

(हे मानवा, तू राज्योपभोग, स्वर्गसुख आणि जन्मोजन्मी मला अनेक उत्तमोत्तम भोग मिळावेत, अशी इच्छा करु नकोस, तर या जगातील दु:खाने गांजून गेलेल्या अनेक प्राण्यांचे क्लेश नाहीसे व्हावेत याची इच्छा धर आणि तसे प्रयत्नही कर)मला कॅन्सरची बाधा झाली नसती तर, मीही इतर स्त्रियांप्रमाणे चूल आणि मूल – रांधा वाढा उष्टी काढा – यातच आयुष्य घालवले असते, पण, कॅन्सरमुळे माझे जीवनच बदलले. 'मी आणि माझा संसार' ही भावना दूर जाऊन, समाजासाठी काहीतरी चांगले काम करण्याची संधी मिळाली म्हणून आता मी कॅन्सरला आपला शत्रू न मानता मित्र मानते. आपल्या जीवनात सुख–दु:खाचा वाटेकरी होणाऱ्या, आपली प्रगती होण्यासाठी साहाय्य करणाऱ्या व्यक्तीला आपण मित्र म्हणतो, तसेच! पण, मित्र मानले म्हणून त्याने मर्यादा ओलांडायचा प्रयत्न केला तर, औषधोपचार, रेडिएशन, केमोथेरपीचा धाक घालून त्याला लांबच ठेवते. अविनाशनेही आपल्या बायकोच्या या मित्राला खिलाडूपणे मान्यता दिली आहे. कॅन्सरही असाच माझा सांगाती आहे .. शेवटपर्यंत साथ देणारा! **(समाप्त)**


सर्व कऱ्हाडे ब्राह्मण परिवारास हार्दिक शुभेच्छा!






कोंकण काजू

**उत्पादक :**

कोकण काजू सांडगी मिरची
फणस–तळलेले गरे काजूकतली

**प्रा. सौ. मृणालिनी विजय फणसळकर**

मु. पो. – आंगले, ता. राजापूर, जि. रत्नागिरी
फोन. : ९४२२२९६५५३, ०२३५३–६५६२५१

*With Best Compliments From*

Happy Home Services
Consultant for Real Estate

S.S. Naphade
Ph. 25882893
Mobile : 9422302641

Deals in outright
Purchase / Rental of
Bungalows, Flats, Shops,
Plots & Property

Bldg. No. B-3, Flat No. B-6,
Chintamaninagar, Anand Park,
Aundh, Pune - 411 007.

## संस्था वृत्त

**कऱ्हाडे ब्राह्मण सेवामंडळ डोंबिवली (जि. ठाणे)**

अंबरनाथ नगरकार्यकारिणीचा २०१३ चा वासंतिक संमेलनाचा कार्यक्रम, रविवार दि. २९.४.१३ रोजी सायं ४ वाजता ब्राह्मण सभा दत्तमंदिर वडवली विभाग अंबरनाथ (पू.) येथे संपन्न झाला. सदर कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुण्या म्हणून ख्यातनाम व्यावसायिका मा. सौ.प्रज्ञा प्रकाश काणे(बोरवणकर) या उपस्थित होत्या. याच कार्यक्रमात अंबरनाथ येथील ७५ वर्षे पूर्ण केलेल्या, ज्ञातीतील सभासदांचा सपत्निक सत्कार केला. त्यानंतर प्रमुख पाहुण्यांनी आपले मनोगत सादर केले. मध्यंतरात अंबाडाळ व पन्हे देऊन उपस्थितांना तृप्त केले. मध्यंतरा नंतर श्री.सचिन ठाकूरदेसाई व सौ. मृणाल ठाकूरदेसाई यांच्या सुमधुर गीतांचा कार्यक्रम झाला. प्रेक्षक त्यांच्या गायनाने भारावून गेले. कार्यक्रमाचा शेवट सशुल्क भोजनाने झाला.

स्वाती ल. प्रभुदेसाई

### ९ मे २०१३ रोजी श्रुती मंगल कार्यालयात झालेला वासंतिक उत्सव २०१३ चा वृत्तांत

सालाबादप्रमाणे ह्यावर्षीदेखील कऱ्हाडे ब्राह्मण संघ, पुणे चा वार्षिक वासंतिक उत्सव ९ मे रोजी आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमाचे वैशिष्टय म्हणजे आपल्या ज्ञातीतील भारतीय सेना दलामध्ये गौरवशाली सेवा करून निवृत्त होऊन, पुण्यात वास्तव्यास असणाऱ्या अधिकाऱ्यांची कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी केलेला गौरव सोहळा होता. यात सेनेच्या तिन्ही दलातील अधिकाऱ्यांचा समावेश होता.

जवळ जवळ २ महिने आधी याची सुरुवात करावी लागली होती. 'सदर्न कमांडच्या' सौजन्याने या अधिकाऱ्यांचे पत्ते मिळाले. विश्वस्त मंडळाची सर्व टीम या कामी लागली होती. प्रत्येक अधिकारी यांच्याशी वैयक्तिक संपर्क साधण्यात आला होता व त्यांची संमती घेतली गेली.

प्रवेश द्वारावर या अधिकाऱ्यांचे वेगळे स्वागत करण्यात आले. पारंपरिक वासंतिक पेय प्रथम देऊनच सभागृहात प्रवेश होता. आपल्या सभासदांपैकी श्री. रामदास प्रभुदेसाई यांचा तरुण मुलगा कु. राजस याने synthesizer वर देशभक्तीपर गीते वाजवून वातावरण निर्मिती केली. राष्ट्रगीत वाजवल्यानंतर कार्यक्रमास सुरुवात झाली. अध्यक्षांच्या प्रास्ताविकानंतर मुख्य कार्यक्रमाला प्रारंभ झाला. लेफ्ट. जनरल पंडित यांच्यापासून सत्कार सुरु झाले. तीनही सेनादलातील मेजर जनरल, ब्रिगेडीअर, कर्नल, रिअर अडमिरल, विंग कमांडर अशी विविध उच्च पदे भूषविलेले, असे ३४ अधिकारी उपस्थित होते.

श्रीफळ, सन्मान पत्र, व उभयतांना पुष्प गुच्छ देऊन सत्कार करण्यात आले. प्रत्येक वेळी उपस्थित सभासदांनी उत्स्फूर्तपणे टाळ्या वाजवून दाद दिली. या मध्ये सर्व विश्वस्त मंडळाच्या सभासदांनी झटून भाग घेतला. इतकेच नव्हे; तर सौ. फणसळकर व सौ. चांदोरकर या माजी सदस्यांनी देखील मोलाची मदत केली. सौ. कानेटकर यांनी पसायदान म्हटल्यानंतर कार्यक्रम संपला.

बहुतेक सर्व अधिकारी व त्यांच्या पत्नी यांनी, काजरेकरांच्या सुग्रास जेवणाचा आनंद लुटला.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सौ. विनया देसाई यांनी यशस्वीरित्या सांभाळले. सर्व मिळून अंदाजे ३२५ सभासद उपस्थित होते.

**पुणे –** कऱ्हाडे ब्राह्मण संघ पुणे तर्फे स्वातंत्र्य सेनानी; रणरागिणी, झाशी राणी लक्ष्मीबाई यांच्या स्मृती दिनानिमित्त मंगळवार दि. १८ जून २०१३ सकाळी ९.३० वाजता, बालगंधर्व रंगमंदिर परिसरातील अश्वारुढ पुतळ्यास पुष्पहार अर्पण करण्याचा कार्यक्रम संपन्न झाला. कऱ्हाडे ब्राह्मण संघाचे वतीने आयोजित कार्यक्रमात नगरसेविका सौ. निलीमा खाडे, सौ. माधुरी सहस्त्रबुद्धे, सामाजिक कार्यकर्ते श्री. नंदकुमार एकबोटे आणि संघाचे विश्वस्त, अध्यक्ष श्री. गणेश गुर्जर, उपाध्यक्ष श्री. गोपाळ भाटवडेकर कार्यवाह श्री.हेमकिरण बाक्रे, श्री. लक्ष्मीकांत देसाई, श्री. दत्तप्रसाद सावकार, श्री.हेमंत पुराणिक, श्री.मकरंद फणसळकर, श्री.गिरीशकुमार टोळे, मा. श्री. रघुनाथ सप्रे, श्री.जयवंत भोपटकर उपस्थित होते. मॉडर्न गर्ल्स हायस्कूलच्या ३०० विद्यार्थीनी, तसेच मुख्याध्यापिका सौ. निकम आणि शिक्षीका उपस्थित होत्या. शाळेचा घोष विभागाची उप–स्थिती विशेष करून जाणवली.

### जाहिरातीचे दर

| पान | एकवेळ | चारवेळा |
|---|---|---|
| पाव | ४००/– | १५००/– |
| अर्धा | ८००/– | ३०००/– |
| पूर्ण | १६००/– | ६०००/– |
| शुभेच्छा | २५०/– | १०००/– |
| पुर्ण पान रंगीत | २५००/– | १००००/– |

**मागील अंकात अनावधानाने झालेले अनेक मुद्रणदोष आमच्या निदर्शनास आणून दिले गेले आहेत. त्याबद्दल आम्ही दिलगीर आहोत.**

**यापुढे अशा चुका होणार नाहीत यासाठी आम्ही प्रयत्नशील राहू.**


**संपादक**

# शतायुषी

शब्दांकन - श्री. अरविंद रामचंद्र भाटवडेकर, फोन नं. ०२५१-२३२९००२

**पुण्यासारख्या ठिकाणी रहात असतो, तर लोकमान्य टिळकांसारख्या महामानवाला 'याचि देही याचि डोळा' पाहण्याचा योग कदाचित् आला असता असे तात्यांनी गप्पांच्या ओघात सांगितले. १९२८-२९ साली ते लोकल बोर्ड रत्नागिरी येथे नोकरीस लागले. १९६२ साली लोकल बोर्ड जिल्हा परिषदेत विलीन झाले. तेथून १९६७ साली लेखाधिकारी (Accountant) म्हणून ते निवृत्त झाले. निवृत्तीनंतरही त्यांनी आपले सामाजिक कार्य चालूच ठेवले व तेही विनामूल्य! भुविकास बँकेत त्यांनी मॅनेजर म्हणून काम पाहिले. तसेच गीता मंडळाच्या वाचनालयाचे काम त्यांनी अनेक वर्षे समर्थपणे सांभाळले. कऱ्हाडे ब्राह्मण संघाच्या रत्नागिरी शाखेचे ते संस्थापक सदस्य! वधूवर सूचक मंडळाच्या माध्यमातून त्यांनी अनेक लग्ने जमविली.**

क्रिकेट खेळणाऱ्या प्रत्येक खेळाडूचे ध्येय शतक काढणे हेच असते. तीन आकडी धावसंख्या पार करताना फलंदाजाच्या शारिरीक व मानसिक क्षमतेचा कस लागतो. क्रिकेटच्या मैदानावर एकवेळ शतक काढणे सोपे पण प्रत्यक्ष जीवनात शंभरी गाठणे महाकर्मकठीण! लाखात एखाद्याच्या नशिबी हा दुर्मिळ योग येतो.



कसोटी कारकीर्दीत कधीच नव्वदीत बाद न झालेल्या ब्रॅडमन यांनी २९ शतके झळकावली. पण दुर्दैवाने आयुष्याचे शतक मात्र त्यांना पार करता आले नाही. वयाच्या ९२ व्या वर्षी त्यांना कायमचे बाद होऊन पॅव्हेलियनमध्ये परतावे लागले.

ब्रॅडमननंतर फक्त २० दिवसांनी जन्मलेल्या (जन्मतारीख १६.९.१९०८) प्रसिद्धीच्या झोतात अजिबात न आलेल्या व सर्वसामान्य आयुष्य जगलेल्या श्री. अनंतराव दत्तात्रय खांडेकर यांना मात्र शंभरी पार करण्याचे भाग्य लाभले आहे. १६ सप्टेंबर रोजी ते १०५ व्या वर्षात पदार्पण करतील; तेव्हां या दुर्मिळ प्रसंगाचे साक्षीदार असणाऱ्या त्यांच्या नातेवाईकांसाठी ती आत्यंतीक आनंदाची गोष्ट असेल.

नातेवाईक व परिचित त्यांना 'तात्या' या घरगुती नावानेच संबोधतात. नात्याने ते माझे आजेसासरे आहेत. म्हणून मी त्यांचा तात्या असाच उल्लेख करतो.

पत्नीच्या निधनानंतर त्यांचा मुक्काम अंबरनाथला मुलाकडेच आहे. लहानपणी तात्यांनी वडीलधाऱ्या मंडळींना नमस्कार केला असेल; तेव्हां त्यांनी 'शतायुषी भव' असा तोंडभरून आशिर्वाद दिला असेल. आज त्या ज्ञात अज्ञात व्यक्तींचे आशिर्वाद सत्यात उतरले आहेत. अर्थात यामागे त्यांच्या सात्विक आचारविचार प्रगत व आधुनिक विचार, नियमित आहार व व्यायाम, निर्व्यसनीपणा, या सर्व गोष्टींचा सिंहाचा वाटा आहे हे निश्चित! सर्वांनी अनुकरण करावे असेच हे गुण आहेत.

तात्यांचे बहुतेक सर्व आयुष्य रत्नागिरी जिल्ह्यात व त्यातील ८० वर्षाहून जास्त काळ रत्नागिरी शहरात व्यतीत झाला आहे.

त्यांचा जन्म पाली रत्नागिरी जवळील घाटिवळे खेड्यात झाला. तेथे त्यांचे तिसरीपर्यंत शिक्षण झाले. पुढील शिक्षण देवळे व देवरूख या ठिकाणी झाले. लोकमान्य टिळकांच्या निधनानंतर १९२०-२१ साली ते रत्नागिरीच्या राष्ट्रीय शाळेत दाखल झाले. तेथे सुतकताई, विणकाम इ. गोष्टी शिकवल्या जात. सहावी, सातवी त्यांनी इंग्रजी शाळेत शिक्षण घेतले.

पुण्यासारख्या ठिकाणी रहात असतो, तर लोकमान्य टिळकांसारख्या महामानवाला 'याचि देही याचि डोळा' पाहण्याचा योग कदाचित् आला असता असे तात्यांनी गप्पांच्या ओघात सांगितले.

१९२८-२९ साली ते लोकल बोर्ड रत्नागिरी येथे नोकरीस लागले. १९६२ साली लोकल बोर्ड जिल्हा परिषदेत विलीन झाले. तेथून १९६७ साली लेखाधिकारी (Accountant) म्हणून ते निवृत्त झाले.

निवृत्तीनंतरही त्यांनी आपले सामाजिक कार्य चालूच ठेवले व तेही विनामूल्य! भुविकास बँकेत त्यांनी मॅनेजर म्हणून काम पाहिले. तसेच गीता मंडळाच्या वाचनालयाचे काम त्यांनी अनेक वर्षे समर्थपणे सांभाळले. कऱ्हाडे ब्राह्मण संघाच्या रत्नागिरी शाखेचे ते संस्थापक सदस्य! वधूवर सूचक मंडळाच्या माध्यमातून त्यांनी अनेक लग्ने जमविली. त्यांच्या अथक प्रयत्नातून कऱ्हाडे ब्राह्मण संघाचा टुमदार हॉल बांधून झाला. ती. तात्यांनी ५ वर्षे पावस संस्थानचे हिशेब तपासनीस म्हणून काम पाहिले. तेही विनामूल्य! त्यामुळे स्वामी स्वरुपानंदांचा निकट सहवास व स्नेह त्यांना

प्राप्त झाला. स्वामींनी त्यांना स्वलिखित पुस्तके भेट म्हणून दिली. स्वामींचा प्रसाद समजून तात्यांनी ती स्वीकारली. परंतु 'इदं न मम' या वृत्तीने ती स्वत:जवळ न ठेवता गीता मंडळाला दान म्हणून दिली.

तात्यांनी रत्नागिरीत महात्मा गांधीची भाषणे ऐकली आहेत. अंदमान तुरुंगातून स्वातंत्र्यवीर सावरकर यांना रत्नागिरीला राजकारण न करण्याच्या अटीवर स्थानबद्ध करून ठेवले होते. भागोजी कीर यांच्या मदतीने सावरकरांनी पतितपावन मंदीराची स्थापना केली व अस्पृश्यनिवारणाचे मोठे सामाजिक कार्य केले. तेथे त्यांच्या प्रभात फेऱ्या निघत. त्यात तात्या हिरीरीने भाग घेत. सावरकरांची अनेक उत्कृष्ट भाषणे त्यांनी ऐकली. त्या महापुरुषाचा कायम प्रभाव त्यांच्यावर राहिला. अजूनही सावरकरांची प्रसिद्ध छत्री व त्यांची करारी मुद्रा त्यांच्या डोळ्यासमोर येते. ती. तात्यांनी आपला संसार उत्तम तऱ्हेने पार पाडला. आज त्यांची मुले, मुली, नातवंडे जीवनात स्थिर होऊन, स्वत:च्या घरात सुखाने कालक्रमणा करीत आहेत. ती. तात्यांचे विचार अगदी आधुनिक! मुलींनी उत्तम शिक्षण घेऊन नोकऱ्या करून, स्वत:च्या पायावर उभे रहावे व संसाराला हातभार लावावा ही त्यांची कायम इच्छा! आपल्या नातू व नाती यांना शिक्षणासाठी आपल्याकडे ठेवून घेतले. त्यांच्या नोकरीसाठी प्रयत्न केले व लग्ने जमविण्यात पुढाकार घेऊन त्यांचे आयुष्य मार्गी लावले. आपले पुतणे व भाचे यांना यथाशक्ती मदत केली व सुखदु:खाच्या क्षणी त्यांना मानसिक आधार दिला. म्हणून आज ते समस्त खांडेकर परिवाराचे सर्वात ज्येष्ठ सदस्य म्हणून आदरणीय आहेत.

कृतार्थ जीवन जगलेले तात्या आयुष्यात समाधानी आहेत. ९२–९३ वर्षापर्यंत रत्नागिरीच्या विठ्ठल मंदीरात जाण्याचा नेम कधी चुकला नाही. आपल्या सुवाच्य अक्षरात पोस्ट कार्डावर इनलँड लेटरचा मजकूर लिहित. वयोमानाप्रमाणे लहान अक्षरे दिसत नाहीत, म्हणून त्यांचे पत्रलेखन थांबले आहे. पण अजूनही भिंग घेऊन पेपरवाचन चालू असते. लख्ख गोरा वर्ण, सतेज कांती व टापटीपीचे राहणे यामुळे फारतर ८५ वर्षाचे वाटतात. काही दिवसांसाठी पुण्याला मुलीकडे रहाण्यास गेले होते. तेव्हां न बसता तीन जिने चढून गेले यावरून तब्येतीचा सहज अंदाज यावा. दीर्घायुषी व्यक्तींना आपले नातेवाईक, मित्र, प्रियजन यांचा वियोग सहन करावा लागतो. तसा तो अनुभव ती. तात्यांनाही अनेकवेळा आला. स्वत:चे बहीण, भाऊ, मुलगी, ५८ वर्षाचा मुलगा, भाचे यांचे मृत्यु त्यांना पहावे लागले. एप्रिल २००८ मध्ये त्यांना दोन जबरदस्त धक्के सहन करावे लागले. सात दशके त्यांना समर्थपणे साथ देणाऱ्या त्यांच्या पत्नी सौ. माई यांचे निधन झाले. व त्यानंतर चारच दिवसांनी ज्येष्ठ जावई ती. दादा देव यांचेही अचानक निधन झाले. स्वत:चे दु:ख बाजूला ठेवून ते लेकीकडे येऊन राहिले व तिला मानसिक आधार देऊन दु:ख हलके केले.

स्व. सौ. माई अगदी सुगरण होत्या. त्यांनी घेतलेल्या उत्तम काळजीने वयाची शंभरी गाठता आली. या शब्दात पत्नीबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. गीतेच्या तत्वज्ञानामुळे ते दु:खातून आता सावरले आहेत.

वयाची शंभर वर्षे पूर्ण केल्याबद्दल सरकारने पण त्यांना १०० टक्के दाद दिली आहे. १६ सप्टेंबर २००८ पासून त्यांच्या पेन्शनमध्ये १०० टक्के वाढ झाली.

ती. तात्यांची तब्बेत अशीच उत्तम राहून, सर्वात जास्त जगलेली व्यक्ती म्हणून 'गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्डमध्ये' त्यांचा समावेश व्हावा हीच या मंगलप्रसंगी सर्वांची इच्छा आहे.


कऱ्हाडे ब्राह्मण संघाच्या ८१ व्या वर्षानिमित्त
हार्दिक शुभेच्छा !

**वसुधा एंटरप्रायजेस**

इंटरिअर डेकोरेटर्स

**श्री. नंदकुमार सप्रे ९८८१२०८८४८**

■ फर्निचर ■ प्लंबिंग ■ पेंटींग ■ फॅब्रिकेशन ■ (ग्रिल्स, सेफ्टी डोअर) ■ ॲल्युमिनिअम स्लायडिंग विंडोज ■ पार्टिशन्स ■ डोअर्स पीओपी फॉल्स सिलिंग ■ लॉफ्ट टँक ■ स्टेनलेस स्टील डासांच्या जाळ्या ■ किचन ओटा एक्स्टेंशन ■ वॉल टायलिंग ■ फ्लोरिंग ■ किचन ट्रॉलीज ■ लॉफ्ट क्लोजींग ■ संडास बाथरुम वॉटरप्रुफिंग ■ बाथरुम रिनोव्हेशन ■ सन कंट्रोल फिल्म ■ वायरिंग ■ पीव्हीसी फ्लोरिंग.

वसुधा एंटरप्रायजेस म्हणजे...
... सर्व सेवा एकाच छताखाली



**निकेत फोटोज्**

कर्वेनगर शाखा

**सौ. नेहा सप्रे – ९८५०८८४९४५**

| | |
|---|---|
| पोर्ट फोलिओ | स्कॅनिंग |
| स्टुडिओ फोटोज् | व्ही.एच.एस. / डीव्ही कॅसेटची सीडी |
| पासपोर्ट फोटोज् | कॅमेरा रिपेअरिंग |
| रोल्स डेव्हलपिंग/प्रिंटींग | टेबल टॉप्स |
| लॅमिनेशन | इंडस्ट्रिअल फोटोग्राफी / व्हिडीओ शूटींग |
| डिजीटल मिक्सिंग फोटोज् | सर्व प्रकारच्या लहान मोठ्या कार्यक्रमांचे |
| कोलाज् | फोटो आणि व्हिडीओ शूटींग |

✻ अपंग किंवा दुर्धर आजारी लोकांसाठी
घरी येऊन फोटो काढण्याची सुविधा

# गरजू रुग्णांना मदत देणाऱ्या संस्थांचे पत्ते

कित्येक गरीब व मध्यमवर्गीय नागरिकांना किंवा त्यांच्या कुटुंबातील सदस्यांना, अत्यंत दुर्धर आजाराच्या उपचारार्थ लाखो रुपयांचा खर्च असतो. अशा वेळी त्यांना आर्थिक मदतीची अत्यंत गरज असते.

महाराष्ट्रात अशांना आर्थिक मदत करणाऱ्या अनेक संस्था, ट्रस्ट फाऊंडेशन आहेत; पण त्यांचे पत्ते कोणालाच माहिती नसतात. तसेच कोणती कागदपत्रे असावी लागतात याची माहिती नसते. सोबत काही अशा संस्थेचे पत्ते व अर्जासोबत आवश्यक अशा कागदपत्रांची माहिती सोबत जोडली आहे. हृदय, मेंदू, किडणी कॅन्सर अशा दुर्धर रोगाच्या शस्त्रक्रियेसाठी गरीब लोकांना आर्थिक मदत देणाऱ्या संस्थांचे पत्ते –

१ मा. पंतप्रधान सहायता निधी, संसद भवन नवी दिल्ली. (खासदाराचे शिफारसपत्र आवश्यक).
२. मा. मुख्यमंत्री यांचे स्वीय सचिव मंत्रालय मुंबई ४०००३२ (आमदारांचे शिफारसपत्र आवश्यक).
३. श्री सिद्धिविनायक गणपती ट्रस्ट, बी. के. बोले मार्ग, दादर, मुंबई ४०००२८ (सोबत आमदारांचे शिफारसपत्र आवश्यक).
४. श्री महालक्ष्मी मंदिर चॅरिटेबल ट्रस्ट भुलाभाई देसाई रस्ता, मुंबई ४०००२६ (सोबत आमदारांचे शिफारसपत्र आवश्यक)
५. ओसवाल बंधू समाज ३२१/ए/३ महात्मा फुले पेठ, शंकरशेठ रस्ता कॉर्नर, पुणे ४११०४२.
६. रोहन बिल्डर्स, ७५९/७४ प्रभात रोड पोलिस ठाण्याजवळ, डेक्कन जिमखाना, पुणे ४११००४.
७. श्री शनिशिंगणापूर ट्रस्ट, मु.पो. शिनिशिंगणापूर, जि. अहमदनगर.
८. मा. अध्यक्ष साहेब, शिर्डी साईबाबा संस्थान, शिर्डी, जि. नगर.
९. शिवामृत सर्वसेवा व विकास संस्था, विजयनगर, अकलूज, ता. माळशिरस, जि. सोलापूर.
१०. 'जीवदायी देवी मंदिर ट्रस्ट विरार (पूर्व) ता. वसई, जि. ठाणे.
११) एन. आर. बलदोटा फाउंडेशन, हॉटेल शांग्रिलाजवळ, चिपळूण रस्ता, पुणे (पुणे जिल्हा मर्यादित).
१२) श्रीराम रा.रा. राठी आशीर्वाद चांडक गार्डन, बुधवार पेठ, सोलापूर.
१३. श्री गजानन महाराज ट्रस्ट, मु. शेगाव, जि. अकोला.
१४. दगडू हलवाई गणपती ट्रस्ट, पुणे. वेळ स. ११ ते सा. ५.
१५. श्री महाबळेश्वर मंदिर ट्रस्ट, महाबळेश्वर, ता. वाई. जि. सातारा.
१६. दाबालीबेन मेहता ट्रस्ट, खातू मेन्शन, ओमर पार्क, ९५ भुलाबाई रस्ता, मुंबई ३६.
१७. श्री. वैशव सेवा समाज ट्रस्ट ६९, गोवर्धन हवेली मार्ग, सेक्टर २९, वाशी, नवी मुंबई.
१८. श्रीमती का.शा. कोठारी ट्रस्ट, राधाकृष्ण मंदिर, ११ मार्ग सेक्टर, जुहू, नवी मुंबई.
१९. गुडलक नेरोलॅक पेंटस चॅरिटेबल ट्रस्ट, गणपत कदम मार्ग, परेल (लोअर) मुंबई.
२०. फिरोज गोदरेज फाउंडेशन, गोदरेज भुवन, ४ ए, होमस्ट्रीट फोर्ट, मुंबई.
२१. एम. सी. धिया ट्रस्ट इंडियन एज्युकेशन इमारत, चर्चगेट, मुंबई २०.
२२. लोधाभाई संगमभाई गाला ट्रस्ट, ६ अभिषेक बिल्डिंग, वल्लभभाई रोड, मुंबई.
२३. पलंजी शायुरजी चॅरिटेबल ट्रस्ट, न्यू इंडिया सेंटर, ११ वा मजला, कूपरेज मादाम क्यूरी मार्ग, मुंबई.
२४. इंडोजर्मन सोशल सर्व्हिस सोसायटी, २८ लोधी रोड इन्स्टु. एरिया, न्यू दिल्ली ३.
२५. महावीर हार्ट फाउंडेशन, अवंती अपार्टमेंट, बी–विंग, ग्राउंड फ्लोअर, सायन (प.) मुंबई.
२६. श्री स्वामी समर्थ (अक्कलकोट महाराज) शिवसेना भवनजवळ, दादर, मुंबई.
२७. व्यंकटेश हॅचरीज, राजाराम पुलाजवळ, सिंहगड रोड, पुणे. वेळ : सायं ५ ते ८.

**आर्थिक मदत मिळविण्यासाठी आवश्यक कागदपत्रे.**

१) रुग्णाचा किंवा पालकांचा विनंती अर्ज.
२) हॉस्पिटलचे शस्त्रक्रिया खर्चाचे अंदाजपत्रक.
३) मेडिकल सर्टिफिकेट्स.
४) तहसीलदारांचा उत्पन्नाचा दाखला व तो मिळाल्यानंतर १०० रु.च्या स्टँपपेपरवर कुटुंबाचे उत्पन्नाबाबतचे प्रतिज्ञापत्रक नोटीरीकडे ॲफिडेव्हेट केलेले.
५. खेड्यातील रहिवासी असेल, तर ग्रामसेवक किंवा सरपंच यांच्याकडून रहिवासी दाखला घ्यावा. जर रुग्ण शहरात राहत असेल, तर नगरपालिकेतून किंवा नगरसेवकाकडून रहिवासी दाखला घेणे.
६. शिधापत्रिकेच्या पहिल्या व शेवटच्या पानाची झेरॉक्स प्रत.
७. दारिद्र्य रेषेखालील कुटुंबात सर्वेक्षण सन १९९७ ते ९८ (पंचायत समिती कार्यालय) यांचा दाखला. (ग्रामसेवककाकडून दारिद्र्यरेषेचा दाखला घेऊन गटविकास अधिकारी यांच्याकडे जाणे.)
८. रुग्णाचे लहान साईजचे ४ फोटो.
९) स्थानिक खासदार किंवा आमदाराची मूळ प्रतीतील ३ पत्रे.
१०) ही सर्व कागदपत्रे अर्जासोबत जोडून, आपला अर्ज संस्थेकडे द्यावा.

*With*

*Best Compliments*

*from,*

# Snehal Printers

Commercial Printers

Near Hanuman Mandir, Dattawadi, Akurdi,

Pune - 411 035

**Tel. : 020-27652128 / 27651275**

E-mail : swapnilsakhalkar@gmail.com

Shrikant Sakhalkar 9850130920



# खाद्यसंस्कृती कऱ्हाड्यांची

**सुहास खानवलकर**

**भौगोलिक परिसर सारखा असला की, ते सारखेपण अनेकदा खाद्यसंस्कृतीतही दिसतं. कोकणस्थ आणि कऱ्हाडे ब्राह्मणांच्या खाद्यसंस्कृतीत असा सारखेपणा हमखास दिसतो. हे दोन्ही समाज कोकणात पश्चिम किनाऱ्यावर मूळ वस्ती करणारे, साहजिकच त्यांच्या खाद्यपदार्थात नारळ, चिंच-गुळाचा वापर जास्त असतो. पण भौगोलिकतेमुळे खाद्यसंस्कृतीत सारखेपणा असला, तरी मूळ स्वभावात फरक आहे. त्यामुळेच कोकणस्थांतला नेमस्तपणा कऱ्हाड्यांमध्ये आढळत नाही. उलट कोकणस्थांच्या शेजारी राहूनही यांचा हात काहीसा देशस्थांसारखा सैलच असतो. अगदी आयत्यावेळी कुणी पाहुणा आला, तर त्याच्यासाठी भांड्यात जेवण नक्कीच शिल्लक असतं. कऱ्हाडे मूळचे घाटावरील कराडकडचे असं म्हटलं जातं.**

कऱ्हाडे मूळचे घाटावरील कराडकडचे असे म्हटले जाते. पण घाट उतरून ते कोकणात आले आणि कायमचे कोकणातले झाले. इतके की त्यांच्या साऱ्या आवडीनिवडी कोकणी माणसासारख्या झाल्याच. पण त्यांनी खाद्यसंस्कृतीही कोकणातल्या मातीतली उचलली.

भौगोलिक परिसर सारखा असला की, ते सारखेपण अनेकदा खाद्यसंस्कृतीतही दिसतं. कोकणस्थ आणि कऱ्हाडे ब्राह्मणांच्या खाद्यसंस्कृतीत असा सारखेपणा हमखास दिसतो. हे दोन्ही समाज कोकणात पश्चिम किनाऱ्यावर मूळ वस्ती करणारे, साहजिकच त्यांच्या खाद्यपदार्थात नारळ, चिंच-गुळाचा वापर जास्त असतो. पण भौगोलिकतेमुळे खाद्यसंस्कृतीत सारखेपणा असला, तरी मूळ स्वभावात फरक आहे. त्यामुळेच कोकणस्थांतला नेमस्तपणा कऱ्हाड्यांमध्ये आढळत नाही. उलट कोकणस्थांच्या शेजारी राहूनही यांचा हात काहीसा देशस्थांसारखा सैलच असतो. अगदी आयत्यावेळी कुणी पाहुणा आला, तर त्याच्यासाठी भांड्यात जेवण नक्कीच शिल्लक असतं. कऱ्हाडे मूळचे घाटावरील कराडकडचे असं म्हटलं जातं. पण घाट उतरून ते कोकणात आले आणि कायमचे कोकणातले झाले. इतके की त्यांच्या साऱ्या आवडीनिवडी कोकणी माणसासारख्या झाल्या. मात्र हा समाज कोकणातला असला, तरी तो दक्षिण कोकणात म्हणजे सिंधुदुर्ग जिल्ह्यात जास्त पसरलेला नाही. या समाजाचं मूळ वास्तव्य रत्नागिरी जिल्ह्यातील लांजा, चिपळूण परिसरात जास्त आहे.

कोकणास्थांच्या आणि कऱ्हाड्यांच्या जेवणात, जेवण करण्याच्या पद्धतीतही सारखेपणा आहे. मात्र कऱ्हाड्यांचं जेवण कोकणस्थांइतकं गोड नसतं. कोकणास्थांच्या जेवणात चिंच-गुळाचा वापर मोठ्या प्रमाणावर असतो. मात्र कऱ्हाड्यांच्या जेवणात गुळ-चिंच असली, तरी त्यात हिरव्या मिरच्यांचा वापरही मोठ्या प्रमाणावर असतो. एवढंच नाही, तर खास चवीसाठी आणि रंगासाठी म्हणून कऱ्हाडे ब्राह्मणांच्या जेवणात मिरचीपासून बनविलेल्या मसाल्याचाही नियमीत वापर केला जातो. परंतु त्यासाठी संकेश्वरी किंवा बेडगी मिरचीसारखी तिखट मिरची वापरली जात नाही. थोडी कमी तिखट असलेली काश्मिरी मिरची वापरली जाते.

कोकणात राहणाऱ्या प्रत्येक समाजाच्या जेवणात ओल्या नारळाचा वापर वारेमाप केला जातो. परंतु कऱ्हाडे समाजच असा आहे की, आवश्यक तिथे तो ओल्या नारळाचा वापर करतो; पण रोजच्या जेवणात प्रामुख्याने सुक्या नारळाचा वापर अधिक केला जातो. वाल फक्त कोकणातच पिकत असल्यामुळे सर्वच स्थानिक समाज त्यांचा वापर करतो. पण कोकणस्थ समाजात पावट्यांची डाळिंबी प्रसिद्ध असताना हा समाज मात्र कडव्या वालांची डाळिंबीच करतो. कडवे वाल चवीला काहीसे तुरट आणि उग्र असतात. पण या समाजाला सणावाराला या वालांचीच भाजी लागते. विशेष म्हणजे त्यांच्या नेहमीच्या जेवणात वालाच्या डाळिंबीचा वरचष्मा असला, तरी श्रावणात मात्र या समाजात मोठ्या प्रमाणावर मटकीचीच उसळ केली जाते. सध्या श्रावण महिना सुरू असल्यामुळे सर्वत्र मंगळागौरीची धूम आहे. या मंगळागौरीला मटकीची उसळ आणि भाजणीचे वडे, हा या समाजाचा मेनू ठरलेला असतो.

भाजणीचे वडे ही तर या समाजाची खास ओळख! कुठलाही उत्सव असला किंवा जेवणाचा बेत असला, तर त्यात भाजणीच्या वड्यांचा खास मान असतोच. त्यासाठी प्रत्येक कऱ्हाडे कुटुंबात भाजणीच्या पीठाचे डबे भरलेले असतात. साकट्याची म्हणजे फणसाची भाजी, ही देखील या समाजाची खास ओळख आहे. उन्हाळ्याच्या दिवसात फणसाच्या कुयऱ्यांची ही भाजी कऱ्हाडे समाजात घरोघरी केली जाते. ही भाजी करण्याची पद्धत वेगळी असते. फक्त सुकी मिरची, हिंग, हळद आणि गुळ टाकूनच ही भाजी केली जाते. मात्र या भाजीसाठी हिंगाची तयार पूड वापरून चालत नाही. त्यासाठी

खडा हिंगच बारीक करून वापरला जातो.

अशी काही मोजकीच वैशिष्ट्ये कऱ्हाडे



समाजात आहेत. पण ती या समाजाच्या पाकनिपुणतेची ओळख पटवून देण्यासाठी पुरेशी आहेत.

## मटकीची उसळ

साहित्य: मटकी, जिरं-मोहरी-हिंग-हळद, कढीपत्ता, हिरवी मिरची, थोडं लाल तिखट (काश्मिरी मिरचीपासून बनवलेलं), कोथिंबीर, अर्धी वाटी खवलेला नारळ, गुळ, तेल, मीठ.

कृती: मटकी आदल्या दिवशी संध्याकाळी ५-६ वाजता भिजत घालावी. रात्री पाणी काढून पातळ सुती कपड्यात मटकी बांधून ठेवावी, म्हणजे सकाळपर्यंत मस्त मोड येतात. भाजी करतांना आधी कढईत तेल गरम करावं. तेल कडक तापल्यावर फोडणीचं सर्व साहित्य त्यात टाकावं. फोडणी तडतडल्यावर त्यात साफ केलेली मटकी ( मटकीत अनेकदा चाड असतात. ते कढले नाही, तर जेवताना दाताखाली येण्याची शक्यता असते.) टाकावी. नंतर झाकण ठेवून तीन वाफा काढून, मटकी आधी फक्त तेलावरच शिजवून घ्यावी. मटकी साधारण शिजल्यावर झाकण काढून मग त्यात पाणी टाकावं. मटकी पूर्ण शिजत आली की, मीठ, गूळ आणि जिरं-खोबऱ्याचं वाटंण भाजीला लावावं. तसंच रंगासाठी थोडं लाल तिखट टाकावं. गॅस बंद केल्यावर वरून कोथिंबीर भुरभुरावी.

## भाजणीचे वडे

साहित्य: भाजणी साहित्य- दोन वाट्या तांदूळ (बासमती किंवा कोलम), पाऊण वाटी उडदाची डाळ, अर्धी वाटी चनाडाळ, २५ ग्रॅम मेथी दाणे, जिरं २ टेबलस्पून , अख्खे काळे उडीद १ वाटी, जाडे पोहे १ वाटी. हे सर्व पदार्थ कढईत वेगवेगळे भाजून घ्यायचे. थंड झाल्यावर सर्व पदार्थ एकत्र करून रवाळ दळून आणायचं.

कृती: भाजणीचे वडे करायला घेताना आधी, आवश्यक तेवढं पिठ घेऊन त्यात चवीसाठी मीठ, थोडी हळद टाकून त्यात गरम तेलाचं मोहन आणि गरम पाणी टाकून हे सर्व साधारणपणे कालवावं. नंतर परातीत ही भाजणी टाकावी. लाल तिखट,सफेद तीळ घालावे आणि नंतर थंड पाण्याने पीठ कालवून त्याचे सारख्याच आकाराचे गोळे बनवायचे. मग प्लॅस्टिकची पिशवी घेऊन, त्यावर तेल-पाण्याचा हात फिरवून, त्या पिशवीवर पीठाचा गोळा घेऊन वडे थापावेत आणि कढई टाकून लाल रंगावर तळावेत.

## कोथिंबीर वडी

साहित्य: मध्यम आकाराची गावठी कोथिंबीरीची जुडी, भाजलेल्या दाण्यांचा कुट, धणे-जिरे पावडर, हळद, हिरव्या मिरच्यांचा ठेचा, मीठ, तेल, बेसन, सफेद तीळ.

कृती: प्रथम कोथिंबीर साफ करून घ्यावी, मग पाण्यात स्वच्छ धुवून ती चिरून घ्यावी. मीठ-कोथिंबीर एकत्र करून पाणी सुटेपर्यंत चुरायची. पाणी सुटल्यावर त्यात बेसन व वरील सर्व साहित्य टाकावं. सर्व पदार्थ एकत्र मिक्स केल्यावर हे मिश्रण बेताने पाणी टाकून सरसरीत करायचं. नंतर एका कढईत तेल घेऊन त्यात जिरं टाकायचं. जिरं तडतडल्यावर सरसरीत मिश्रण कढईत ओतायचं. या मिश्रणातलं पाणी आटून ते घट्ट झाल्यावर एका थाळीला तेलाचा हात लावून, ते मिश्रण तेलाचा हात लावलेल्या थाळीत ओतायचं आणि थापायचं. हे मिश्रण साधारण सुकल्यावर वड्या पाडायच्या. वड्या नीट सुकल्यावर तेलात खरपूस रंगावर तळायच्या.

## शेवयांची खीर

सहित्य: एक वाटी पांढऱ्या शेवया, २ टेबलस्पून साजूक तूप, अर्धी वाटी साखर, दीड वाटी दूध, वेलची पावडर, बदाम, पिस्ता, काजू.

कृती: प्रथम एका पातेल्यात तूप गरम करून, त्यात शेवया बारीक कुस्करून लालसर रंगावर परतून घ्या. शेवया परततानाच दुसरीकडे दूध तापत ठेवा. ते तापल्यावर व्यवस्थित परतलेल्या शेवयांत टाका. दुधाला उकळी यायला लागल्यावर त्यात साखर घालावी, नीट ढवळावी. साखर विरघळल्यावर काजू-वेलची पावडर, बदाम-पिस्त्याचे काप टाकवेत. दूध साधारण आटल्यावर गॅस बंद करावा.

## सूचना -

१) कृपया आपल्या वर्गणीचे नुतनीकरण योग्यवेळी करा.

२) **कृपया वर्गणी मनिऑर्डरने पाठवू नका.**

३) कृपया आपल्या अंकासंबंधी चौकशी १० तारखेनंतर आपल्या संघ कार्यालयात करा.

४) अंक सर्वांना वेळेवर पाठवले जातात. पण जर आपल्याला अंका १५ तारखेपर्यंत न मिळाल्यास कऱ्हाडे ब्राह्मण संघ, पुणे यांचे कार्यालयांत सोमवार ते शनिवार सायंकाळी ५ ते ७ या वेळांत संपर्क साधावा. दुरध्वनी क्र. ०२० - २४४३२४४३

५) काही वर्गणीदार बँकेत पैसे भरतात पण आमच्या कार्यालयांस कळवायचे राहून जाते व त्यामुळे आम्हाला ते पैसे कुणी भरले हे कळत नाही व त्यामुळे आपल्याला अंक मिळत नाहीत, तरी वर्गणी बँकेत भरल्याचे त्वरीत पुणे कार्यालयास कळवावे.